**सुविचार**

**हम सभी स्वयं को मानव जाति का हिस्सा समझते हैं परन्तु हम देखें कि हम किसी प्रकार की हिंसा तो नहीं करते हैं ?**

(ब्रह्मकुमारीज)


विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १० मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## मोदींचे आता मिशन मॉरिशस



माले : सन २०१५ मध्ये मॉरिशसच्या अधिकृत भेटीदरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मॉरिशसला लिटल इंडिया असे संबोधले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा राजकीय दौरा याच मॉरिशसमध्ये होणार आहे. द्रौपदी मुर्मूंची ही भेट म्हणजे मालदीवमधील चीनचे डावपेच उद्ध्वस्त करण्याचे नवे धोरण मानले जात आहे. द्रौपदी मुर्मूंची ही भेट ११ ते १३ मार्च दरम्यान होणार आहे. मुर्मू या मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून सहभागी होणार आहेत. मॉरिशसचा राष्ट्रीय दिवस १२ मार्च रोजी साजरा केला जातो. दोन्ही देशांमधील राजकीय संबंध १९४८ मध्ये प्रस्थापित झाले होते. त्यानंतर सध्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेता या दौ-याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

२००० या वर्षापासून मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणा-या द्रौपदी मुर्मू या सहाव्या भारतीय राष्ट्रपती आहेत. या समारंभात भारतीय नौदलाची तुकडी आणि दोन युद्धनौकांसह आयएनएस तीर आणि सीजीएस सारथी देखील सहभागी होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, भारत मॉरिशससोबत १४ करार करू शकतो. मोदी सरकारच्या सागर धोरणांतर्गत मॉरिशसमध्ये सहा नवीन प्रकल्पही पूर्ण होणार आहेत. या दौ-यात त्या अनेक बड्या नेत्यांनाही भेटणार आहेत. यावर्षी २९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद जुगनाथ यांनी हवाई तळ आणि नौदल बंदर विकसित करण्यास हिरवा कंदील दाखवला होता.

लष्करी तळ महत्त्वाचा का?

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा हा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा मालदीवचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू सत्तेवर आल्यानंतर भारतासोबतचे मालदीवचे संबंध बिघडू लागले आहेत. त्यांची चीनशी जवळीक वाढत आहे. या दरम्यान, एक बातमी अशीही आली आहे की, १० मार्चपासून भारताने मालदीवमधून आपले सैन्य मागे घेण्यास सुरुवात केली आहे. पूर्वनिर्धारित मुदतीनुसार भारतीय सैन्य मालदीवमधून माघार घेतील. या दरम्यान, मुर्मू यांचा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मॉरिशस बेट ज्यावर भारत आणि मॉरिशस संयुक्तपणे लष्करी तळ बांधत आहेत ते मॉरिशसच्या मुख्य बेटापासून ११०० किलोमीटर अंतरावर आणि मालदीव, सेशेल्स आणि अमेरिकेच्या ताब्यात असलेल्या डिएगो गार्सियाच्या मध्यभागी आहे. त्यामुळेच ते लष्करी रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.



## मनसे-भाजपाच्या विचारधारेत फरक नाही

नागपूर : लोकसभा निवडणुकीत मनसे-भाजपा एकत्र येतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. निवडणुकीचे काय निर्णय घ्यायचे हे लवकरच सांगेन, तोपर्यंत संयम ठेवा, असे सांगत राज ठाकरे यांनी आजच्या सभेत सस्पेन्स कायम ठेवला आहे. तर तिकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखिल पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना मनसे-भाजपाच्या विचारधारेत फरक नाही असे म्हणत मनसे-भाजपा युतीबाबत सूचक विधान केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनसेने जी काही व्यापक भूमिका घेतली आहे ती आमच्या विचारांशी विसंगत नाही. क्षेत्रीय अस्मिता ही आम्हाला मान्यच आहे. महाराष्ट्रात राहून मराठी माणसांबद्दल बोलणे हे योग्यच आहे. मराठी माणसांच्या हक्कासोबत त्यांनी जी हिंदुत्वाची भूमिका घेतली आहे त्यामुळे मनसे-भाजपा यांच्यात फारसे अंतर राहिलेले नाही. बाकी निवडणुकीत काय होईल हे सांगता येत नाही. जे काही आहे, चर्चेवर होईल. योग्य वेळी योग्य गोष्टी होत असतात, असे ते म्हणाले.

तर दिल्लीत बैठक सकारात्मक झाली आहे. एकाच बैठकीत सगळे निर्णय होतील असे नाही. परंतु ८० टक्के काम कालच्या बैठकीत झाले आहे. २० टक्के काम आमचे सुरू आहे. ते देखील फोनवरून होत आहे. लवकरच सर्वकाही स्पष्ट होईल, असे सांगत देवेंद्र फडणवीसांनी महायुतीच्या जागावाटपावर भाष्य केले.

दरम्यान, भाजपाला जास्तीत जास्त जागा महाराष्ट्रात लढवायच्या आहेत तर एकनाथ शिंदे-अजित पवार हेदेखील जागांवरील दावा सोडायला तयार नाहीत. अशातच शिंदे-फडणवीस-अजितदादा यांना दिल्लीत बैठकीला बोलावण्यात आले. शुक्रवारी रात्री उशिरा अमित शाह यांच्या निवासस्थानी या नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत जवळपास जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांनुसार, महाराष्ट्रातील ४८ पैकी ३० हून अधिक जागा भाजपा लढवणार आहे तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला १० आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ६-८ जागा देण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबईची जागा शिवसेना भाजपाला सोडण्यास तयार आहे. एनडीएने महाराष्ट्रात ४५ जागा जिंकण्याचे टार्गेट ठेवले आहे. शुक्रवारी संध्याकाळी ७ वाजता या बैठकीला सुरुवात झाली होती. तब्बल सहा तासांनी रात्री एकच्या सुमारात हे तिन्ही नेते शाह यांच्या बंगल्यातून बाहेर पडताना दिसले.

## शाकाहारी थाळी महाग तर मांसाहारी स्वस्त



पुणे : कांदा आणि टोमॅटोच्या दरात वाढ झाल्याने फेब्रुवारीमध्ये शाकाहारी थाळी सात टक्क्यांनी महागली आहे. मात्र, चिकनच्या दरात कपात झाल्याने मांसाहारी थाळीचे दर नऊ टक्क्यांनी स्वस्त झाले आहेत. यापूर्वी जानेवारीमध्येही असाच ट्रेंड होता.

क्रिसिल मार्केट इंटेलिजेंस अँड ॲनालिसिसने शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या मासिक अहवालात म्हटले आहे की, फेब्रुवारीमध्ये पोल्ट्रीच्या किमतीत घट झाल्यामुळे मांसाहारी थाळी नऊ टक्क्यांनी स्वस्त झाली आहे.

यामध्ये व्हेज थाळी आणि नॉनव्हेज थाळी ची किंमत शाकाहारी खाद्यपदार्थ बनवण्यासाठी वापरण्यात येणारे मुख्य पदार्थ आणि मांसाहारी पदार्थ बनवताना वापरल्या जाणा-या वस्तूंच्या किमतीच्या महागाईच्या आधारावर मोजण्यात आली आहे.

चिकनचे दर २० टक्क्यांनी कमी झाले

वर्षभरात कोंबडीच्या किमती २० टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. मांसाहारी थाळीच्या खर्चात त्याचे ५० टक्के योगदान आहे. त्यामुळे मांसाहारी थाळी स्वस्त झाली आहे. या वर्षी जानेवारीच्या तुलनेत चिकनचे दर १० टक्क्यांनी कमी झाले आहेत. गेल्या महिन्यात शाकाहारी थाळी स्वस्त झाली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे मांसाहारी थाळी सुमारे पाच रुपयांनी स्वस्त झाली आहे.

बर्ड फ्लूचा प्रसार

ब्रॉयलर चिकनचे भाव २० टक्क्यांनी घसरले आहेत. दरवर्षी मांसाहारी थाळीच्या किमतीत घट होण्याचे हे प्रमुख कारण आहे. अहवालानुसार, बर्ड फ्लूचा प्रसार झाल्यामुळे पवित्र रमजान महिन्यापूर्वी चिकनचा पुरवठा मर्यादित झाला आहे. तसेच चिकनच्या मागणीत वाढ झाल्याने फेब्रुवारीमध्ये ब्रॉयलरच्या दरात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## राहुल गांधींविरोधातील दाव्यात पोलिसांना कारणे दाखवा



पुणे : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विरोधात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेल्या दाव्यात फौजदारी प्रक्रिया संहिता २०२ अन्वये सखोल तपास करून पोलिसांना २३ फेब्रुवारीपूर्वी तपासणी अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अक्षी जैन यांनी दिले होते. मात्र, तपासणी अहवाल दिनांक ५ मार्चपर्यंत सादर न केल्यामुळे न्यायालयाने संबंधित पोलिसांना कर्तव्यात कसूर केल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, अशी माहिती सात्यकी सावरकर यांचे वकील ॲड. संग्राम कोल्हटकर यांनी दिली आहे.

राहुल गांधी यांनी लंडनमध्ये अनिवासी भारतीयांसमोर भाषण केले होते. त्यात त्यांनी डोकलाम आणि सावरकरांचा संदर्भ दिला होता. ते म्हणाले होते की, सावरकर आणि त्यांचे पाच-सहा मित्र एका मुस्लिम व्यक्तीला मारत होते. तेव्हा सावरकरांना आनंद होत होता, असे त्यांनी पुस्तकात लिहिले आहे. तसेच डोकलामचा उल्लेख करीत समोरची पार्टी कमजोर असेल तर तिला मारावे आणि जर आपण कमजोर असू तर पळून जावे असे विधान गांधी यांनी केले होते. या वादग्रस्त विधानाप्रकरणी सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल **(पान ७ वर)**

## बारामतीचा उमेदवार सुप्रिया सुळे



पुणे : सुप्रिया सुळेंचे संसदेतील काम बोलके आहे, त्यामुळे आज मी तुमच्यासमोर बारामतीचा उमेदवार जाहीर करीत असून सुप्रिया सुळे बारामतीतून लढणार असल्याची घोषणा शरद पवार यांनी केली आहे.

संग्राम थोपटेंनी आपल्यासोबत राहावे, शरद पवार पाठिशी असल्यावर विकास काय असतो ते मी दाखवून देईन असेही ते म्हणाले. ते भोरमधील सभेत बोलत होते. सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी बारामती लोकसभा मतदारसंघातील भोरमध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे यांनी या सभेचे नियोजन केले होते. त्यामध्ये बोलताना शरद पवारांनी आपल्या पक्षाच्या पहिल्या उमेदवाराची घोषणा केली. त्यामुळे बारामतीमध्ये आता सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार आहे.

भोरचे आमदार संग्राम थोपटे यांचे वडील आणि माजी मंत्री अनंतराव थोपटे आणि शरद पवार यांचा गेल्या ४० वर्षांपासून राजकीय संघर्ष आहे. त्यांचा हा संघर्ष पुढच्या पीढीमध्ये म्हणजे अजित पवार आणि संग्राम थोपटेंमध्येही असल्याचे दिसून येत आहे. आता बदलत्या राजकारणाचा वेध घेत शरद पवारांनी **(पान ७ वर)**

## सौरऊर्जा क्षेत्रात श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स दमदार पाऊल

### श्री. दिनेश व श्री. रितेश माने यांनी मानले देवेंद्रीजीचे आभार



लातूर / प्रतिनिधी- मागील अनेक वर्षांपासून बांधकाम क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले लातूर येथील श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा. लि. यांनी आता सौरऊर्जा क्षेत्रात पाऊल टाकले असून या कंपनीने पूर्वी ५ मेगावॅटचे काम पूर्ण केले आहे. आता सदर कंपनीस दि. ०७ मार्च २०२४ रोजी लातूर जिल्ह्यासाठी ३७ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती करण्याची परवानगी मिळाली आहे. हा प्रकल्प लातूर जिल्ह्यात उभारला जाणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस यांनी या कामाचा कार्यारंभ आदेश सह्याद्री गेस्ट हाऊस, मुंबई येथे श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा. लि. या कंपनीस दिले आहे.

केंद्र शासनाच्या कुसुम सी ही नैसर्गिक ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देणारी योजना सध्या देशात राबवली जात आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्रामध्ये २.० मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत विविध कंपन्यांकडून सौरउर्जा निर्मिती संदर्भात निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा. लि. या कंपनीची महाराष्ट्र शासनाने सौरऊर्जा प्रकल्पासाठी निवड केलेली आहे. **(पान ७ वर)**

## भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

### चार जखमी औसा - लातूर मार्गावरील घटना



औसा/ प्रतिनिधी- औसा ते लातूर मार्गावर शनिवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगातील कार समोर आलेल्या ऑटोरिक्षाला वाचविण्याच्या प्रयत्नात हॉटेलात घुसल्याने झालेल्या अपघातात कारमधील दोघांचा जागीच तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. यातील चार जखमींवर उपचार सुरू आहेत.

शनिवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास चालकासह सहाजण असलेली क्रेटा कंपनीची कार (एम. एच.-२४-बीआर-७८६८) रत्नागिरी - नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील औश्याहून लातूरकडे येत होती. त्यावेळी समोर ऑटोरिक्षा आल्याने रिक्षाला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे अतिवेगातील कार रस्त्याच्या कडेला असलेल्या हॉटेलच्या कठड्याला जोरात धडकली. यात कारमधील वाजीद पठाण व सोहेल शेख या दोघांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला तर कारमधील अन्य चारजण जखमी झाले आहेत. कारच्या धडकेत हॉटेलसमोर बसलेल्या एका १४ वर्षीय मुलाचे दोन्ही पाय मोडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला तर कारमधील जखमी तीन महिला व एका पुरुषावर लातूर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



नुतन राज्यसभा खासदार नांदेडचे डॉ. श्री. गोपछेडे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा लातूर येथील कार्यक्रमात सत्कार करताना पु. श्री. गहिनीनाथ महाराज बाजूस उपस्थित श्री. नितीन शेटे.

## लातूरच्या लिंगायत समाजाच्या आगळ्या वेगळ्या सत्काराने भारावून गेलो : आ. पाटील




लातूर : आपल्या प्रदीर्घ राजकीय जीवनात आपण अनेक सत्कार सोहळे पाहिले , सोहळ्यांना आवर्जून उपस्थित राहिलो. पण समस्त लातूर जिल्हा लिंगायत समाजाच्या आगळ्यावेगळ्या सत्काराने भारावून गेल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार ) प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी केले.

समस्त लिंगायत समाजाच्या वतीने शुक्रवारी लातूरच्या दौऱ्यावर आलेल्या आ. जयंत पाटील यांचा भव्य सत्कार सोहळा लिंगायत समाजातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व असणाऱ्या उदयकुमार चौंडे यांच्या औसा रोडवरील म जगन्नाथ म निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, राष्ट्रवादीचे नूतन जिल्हाध्यक्ष संजय शेटे, उदयकुमार चौंडे यांसह लिंगायत समाजातील विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार सोहळ्यात आ. जयंत पाटील यांना महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा, वचनसाहित्य देऊन बसवण्णांच्या वचनांचा मंत्रघोष करत लिंगायत पद्धतीने पुष्पवृष्टी करून त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान सोहळा संपन्न होत असताना टाळ्यांच्या गजरांनी संपूर्ण सभामंडप दणाणून गेला होता. हा सोहळा पूर्णतः राजकारण विरहित, स्नेहमिलन प्रकारचा होता. सोहळ्याला लिंगायत समाजातील विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक , उद्योग , व्यापार क्षेत्रात कार्यरत असणारे अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. या सोहळ्याने लिंगायत समाजाची एकता सर्वांना पहायला - अनुभवायला मिळाली.

या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना आ. जयंत पाटील यांनी आपण अक्षरशः भारावून गेल्याचे सांगितले. लिंगायत समाजाचे अल्पसंख्यांक दर्जा , स्वतंत्र धर्म मान्यतेसह विविध प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. त्याची सोडवणूक करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, पण तोपर्यंत लिंगायत समाजाने थोडी कळ सोसावी असे ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीचे सरकार निश्चित येणार आहे. आपले सरकार आल्याबरोबर या प्रश्नांची सोडवणूक केली जाईल. महात्मा बसवेश्वरांनी संपूर्ण जगाला दिशा दाखविण्याचे महान कार्य केले आहे. सन १९९० साली मला स्वतःला उमेदवारी मिळवून देण्यासाठी ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांनी मोलाची मदत केली होती. माझी राजीव गांधींशी भेट घालून देऊन त्यांनी मला विधानसभेचे तिकीट मिळवून दिल्याची आठवणही आ. **(पान ७ वर)**

दैनिक
# यशवंत अहमदपूर/चाकूर परिसर
रविवार दि.१० मार्च २०२४
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७


## यशवंत विद्यालय जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) यशवंत विद्यालय जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील यशवंत विद्यालयात जागतिक महिला दिन दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापूरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी यशवंत विद्यालयातील महिला शिक्षिका सौ विजयाताई स्वामी, सौ.पुष्पाताई साकोळे,सौ. सविताताई झोळगीकर, सौ.वर्षाराणी कांबळे, श्रीमती वर्षाताई लगडे,सोनलताई नानापुरे यांचा शाळेच्या वतीने गुलाब पुष्प, पेन आणि ग्रंथ देऊन प्राचार्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांनी सूत्रसंचालन कपिल बिराजदार यांनी तर आभार धनंजय तोकले यांनी मांनले.

कार्यक्रमाचा शुभारंभ महिला विजयीगीताने करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## समाजातील सर्व स्तरांमध्ये महिलांचा सन्मान झाला पाहिजे
## जिजाऊ सावित्री गौरव पुरस्कार विजेत्या डॉ तृप्ती विशाल भोईटे यांचे प्रतिपादन

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील सर्व स्तरांमध्ये महिलांचा सन्मान झाला पाहिजे असे प्रतिपादन जिजाऊ सावित्री गौरव पुरस्कार विजेत्या डॉ तृप्ती विशाल भोईटे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पुरंदर तालुका माध्यमिक महिला शिक्षक संघाने घेतला विविध क्षेत्रातील कार्य करत असलेल्या महिलांचा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ११ महिलांचा सन्मान दिनांक ०८.०३.२४ रोजी देण्यात आला. देशामध्ये सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार करून स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पुरंदर येथे आयोजित विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळ्यात डॉ तृप्ती विशाल भोईटे यांचाही सन्मान केला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ वर्षा देसाई सचिव सौ मोहिनी लोणकर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा तथा आमदार जगताप साहेबांच्या सूविद्य पत्नी सौ राजवर्धिनी जगताप,पुरंदर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सौ सुनीता कोलते, यांचे आभार तसेच माझ्या वडिलांनी मला डॉक्टर केले त्यामुळे मी माझ्या वडिलांचे उद्योगपती कै नरहरी तथा दादा पांडुरंग काळे यांचेही आभार व्यक्त करते तसेच वैवाहिक जीवनात डॉ विशाल भोईटे यांनी काम करण्याची संधी दिली त्यामुळे हे सर्व शक्य झाले म्हणून त्यांचेही आभार असेही मत व्यक्त केले. आपण काम करत असताना आपले कुटुंब सोडून इतर कोणी आपल्या कामाची दखल घेऊन पुरस्कृत करत असेल तर खूप आनंद होतो.

सदैव आपले आशीर्वाद माझ्या पाठीशी राहो, तसेच हा पुरस्कार नक्कीच मला पुढील सामाजिक कार्यासाठी प्रेरणादायी राहील. असे मत डॉ तृप्ती विशाल भोईटे यांनी व्यक्त केले

## उदयनगर येथे नित्य योग वर्गाची सुरुवात

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) उदय नगर येथे नित्य योग वर्गाची सुरुवात करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महिला पतंजली योग समिती अहमदपूर यांच्यावतीने उदय नगर, टेंभुर्णी रोड अहमदपूर येथे योग शिबिराचे उद्घाटन जिल्हा संवाद प्रभारी कलावती भातांब्रे मॅडम व तहसील प्रभारी पुष्पा ठाकूर यांच्या हस्ते पार पडले. योगशिक्षीका सौ. कलावती भातांब्रे मॅडम यांनी वेगवेगळ्या आसनांची, प्राणायामा ची माहिती व लाभ सांगितले ,तसेच पुष्पा ठाकूर यांनी आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. शिबिरात महिलांनी उत्स्पूर्त पणे सहभाग नोंदवला. नित्य वर्ग ऋतूजा मंदाडे या घेनार आहेत. या कार्यक्रमासाठी विषेश परिश्रम वर्षा मंदाडे यांनी घेतले.

**टी.सी. हरवली आहे**

नेताजी सुभाषचंद्र बोस ज्युनिअर कॉलेज किनगाव, ता. अहमदपूर जि. लातूर या महाविद्यालयाची **जनाबाई बाबुराव शिरसाठ** या नावाची इयत्ता १२ वी पास (विज्ञान ) ची टी.सी. अहमदपूर - किनगाव बस प्रवासात हरवली आहे .


सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.
मो. नं. ८८५७० ६५४२०

## किसान आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी विनायकराव पाटील चोबळीकर यांची निवड

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) किसान आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी विनायकराव पाटील चोबळीकर यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी शेतकरी नेते विनायकराव पाटील चोबळीकर यांची आज निवडीचे पत्र देवून लातूर येथे सत्कार करण्यात आला.

प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील .कु . किसान आघाडी प्रदेश अध्यक्ष पूजा मोरे , माजी मंत्री विनायकराव पाटील, प्रदेश सरचिटणीस सोमेश्वर कदम, प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटिल नागराळकर , आर. डी . शेळके , शिवानंद भोसले आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीत किसान आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शेतकरी नेते विनायकराव पाटील चोबळीकर पूजा मोरे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देताना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील विनायकराव पाटील सोमेश्वर कदम बसवराज पाटील नागराळकर आदी.

## जि.प.प्रशालेचा विद्यार्थी पठाण फैमान मुजीब याची हवाई सहलीसाठी निवड

हडोळती दि.०९(नागसेन गायकवाड) समग्र शिक्षा जि प लातूर अंतर्गत माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची यादी नुकतीच जाहीर झाली आहे. यामध्ये जे निवड करण्यात आलेले विद्यार्थी आहेत,यांनी आठवी वर्गात विशेष प्राविण्य मिळवलेले आहे.

अधिक माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यातून इयत्ता आठवीच्या वर्गातून विशेष प्राविण्य मिळवलेल्या अशा माध्यमिक शाळेतील विद्यार्थी आहेत,लातूर शहर ३ विद्यार्थी,लातूर तालुका ग्रामीण ३ विद्यार्थी,निलंगा तालुका २ विद्यार्थी,औसा २ विद्यार्थी, रेणापूर २ विद्यार्थी,चाकुर २ विद्यार्थी, देवणी २ विद्यार्थी, उदगीर २ विद्यार्थी,शिरूर अनंतपाळ ३ विद्यार्थी,जळकोट २ विद्यार्थी,अहमदपुर २ विद्यार्थी. जिल्ह्यातील दहा तालुक्यातील २५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

हडोळती जि.प. प्रशालेचा विद्यार्थी पठाण फैमान मुजीब याची निवड झाली आहे. हा हवाई सहलीसाठी बेंगलुरु(कर्नाटक) येथे जाणार आहे.असे समजतात गावामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.सर्व विद्यार्थी-पालक आनंद व्यक्त करत आहेत.शाळेचे मुख्याध्यापक एम.डी.मोरे सर, प्रभारी मुख्याध्यापक महालिंगे जे.पी.व शिक्षक,शिक्षिका व विद्यार्थी,पालक यांनी पठाण फैमान मुजीब याचे अभिनंदन केले,आणि परिसरात आनंदाचे वातावरण झाले आहे.

## इंडियन आर्मी मध्ये भरती झाल्याबद्दल रमजान पठाण व अनिकेत कलमे सत्कार

हडोळती दि.०९(नागसेन गायकवाड) इंडियन आर्मी मध्ये भरती झाल्याबद्दल रमजान पठाण व अनिकेत कलमे सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वळसंगी येथे ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच नंदकुमार बोडके व उपसरपंच बाळासाहेब येरमे यांच्या हस्ते इंडियन आर्मी मध्ये भरती झालेल्या रमजान पठाण व अनिकेत कलमे या बहादर भूमिपुत्रांचा शाल ,पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी सरपंच नंदकुमार बोडके यांनी या जवानांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच हे देश सेवेचे काम तुम्ही स्वतः स्वीकारले असून त्या कामाच्या प्रती ईमानदार व प्रामाणिक



असल पाहिजे. कोणत्याही कामामध्ये आणि कुठेही गद्दारीअसू नये. तसेच नोकरी लागली म्हणून बेजबाबदार पणे न वागता उलट जास्त जिम्मेदारी ने वाटचाल केली पाहिजे.गावाकडे वळून बघितलं पाहिजे.आई वडिलांची सेवा केली पाहिजे. अश्या प्रकारच्या माफक अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी ग्रामसेवक सचिन तावरे,प्रदीप देशमुख, नामदेव कलमे,तुकाराम कलमे,सय्यद शादुल,वैजनाथ सूर्यवंशी विमलबाई सूर्यवंशी, ग्रामपंचायत कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिन कुलकर्णी, अंगद वाघमारे,नामदेव नागमे हे ही उपस्थीत होते.

## सादतखान पठाण यांचे दुःखद निधन

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) सादतखान पठाण यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील शेतकरी सादत खान पठाण यांचे यांचे दि. ६ मार्च २०२४ रोजी संध्याकाळी ६.०० च्या दरम्यान वयाच्या ७५ व्या वर्षी राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे.

त्यांचा अंत्यविधी दि. ०७ मार्च २०२४ रोजी गुरुवारी दुपारी १२.०० वाजण्याच्या सुमारास अहमदपूर येथील बडे गुलिस्तान स्मशान भूमीमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सहा मुली, नातवंडे परतवंडे असा मोठा परिवार असून सामाजिक कार्यकर्ते अमजद पठाण यांचे ते वडील होते.

दिवंगत सादतखान पठाण हे मितभाशी, मनमिळावू,



अल्पभूधारक शेतकरी, पशुपालक म्हणून परिसरात ओळख होती. त्यांनी पंधरा वर्षांपूर्वी वाकी नदीच्या पुलावरून वाहून जाणाऱ्या एस टी तील प्रवाशांना स्वतःचा जीव धोक्यात घालून वाचविले होते म्हणून एस टी महामंडळाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आलेला होता.

त्यांच्या दुःखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रा.वैजनाथ सुरनर यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार जाहीर

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) प्रा.वैजनाथ सुरनर यांनामहाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार जाहीर झाला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबईच्या वतीने दिन ,दलित, शोषित, समाजाच्या कल्याणासाठी कार्ये करणाऱ्या व्यक्तिस व संस्थेस दरवर्षी डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार दिले जातात मात्र २०२० ते २०२३ या कालावधीत पुरस्कार जाहीर झाले नव्हते. २०१९-२०२० या वर्षातील डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार चाकूर तालुक्यातील अलगरवाडी येथील रहिवासी असलेले व सध्या सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालय झरी बु येथे कार्यरत असलेले मराठी विषयाचे प्राध्यापक तथा साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे अभ्यासक, साहित्यिक, विचारवंत प्रा.वैजनाथ सुरनर यांना जाहीर झाला आहे.

प्रा.सुरनर यांनी फुले,शाहु, आंबेडकर , अण्णाभाऊ, यांचे विचार जनमाणसात आणि होलार समाजात रुजविण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक प्रबोधन केले आहे. परिवर्तन चळवळीत त्यांचे खूप मोठे योगदान आहे. सदरील पुरस्कार मुंबई येथे दि.१२ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वा.मुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांच्या शुभहस्ते १५ हजार रुपये रोख स्मृतिचिन्ह,मानपत्र, देऊन एका भव्य कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल चंचल भारती विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष माजी मंत्री मा.बाळासाहेब जाधव, आ.बाबासाहेब पाटील,शिक्षक आमदार विक्रम काळे, संस्थेचे सचिव विक्रमसिंह दोडके पाटील, प्राचार्य गिरीधर कणसे, प्राचार्या रसिकाताई देशपांडे मॅडम, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळभाऊ माने,पहिले नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे ,पपण कांबळे, सरपंच सौ.सुरेखाताई सुरवसे , दयानंदभाऊ सुरवसे, अजित खंदारे,अॅड किरण जावीर, शिवाजीराव जावीर, प्राचार्य डॉ.राजकुमार मस्के,प्रा दयानंद झांबरे,प्रा.ज्ञानेश्वर चामे,प्रा.बाळासाहेब बचाटे,प्रा भिमराव साळवे,प्रा.मारोती बुद्रुक, पत्रकार मधुकर कांबळे, प्रशांत शेटे, सुधाकर हेमनर, संग्राम वाघमारे, सलीम तांबोळी, प्रा. डॉ. शिवाजी देवनाळे, डॉ. बालाजी कारामुंगीकर आदिंनी अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## ब्रह्माकुमारीज तर्फे महाशिवरात्री निमित्त 3D होलोग्राफिक भव्य बारा ज्योतिर्लिंग दिव्य दर्शन महोत्सव

अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) ब्रह्माकुमारीज तर्फे महाशिवरात्री निमित्त ३D होलोग्राफिक भव्य बारा ज्योतिर्लिंग दिव्य दर्शन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, ब्रह्माकुमारी विद्यालयात महाशिवरात्री पर्वानिमित्त सर्व बंधू भगिनींसाठी पहिल्यादांच एकाच शिवलिंगावर बारा ज्योतिर्लिंगाचे भव्य, दिव्य , अनुपम असा दर्शन महोत्सव कार्यक्रम दि.०७ मार्च ते ११ मार्च पर्यंत रोज सायंकाळी ४ ते ८:३० वाजेपर्यंत चालू आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन राजयोगिनी ब्र.कु. महानंदा दिदी संचालिका सेवाकेंद्र उदगीर यांच्या हस्ते संपन्न झाले व यावेळी प्रमुख पाहुणे भगिनी वैशाली चामे संचालक आई प्रतिष्ठान अहमदपूर , मा. भ्राता विजयकुमार गुंडाळे - गुंडाळे फॅमिली शॉप अहमदपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




यावेळी आ. महानंदा दिदी यांनी महाशिवरात्री आपण कशाप्रकारे साजरी करावी तसेच ज्योतिर्लिंगावर तीन पानाचेच बेल का वाहतात? आख व धोतराचे फुल का चढवतात याची सविस्तर माहिती सर्वांना देऊन बारा ज्योतिर्लिंगाचे जीवनातील महत्व स्पष्ट केले. कार्यक्रम प्रास्ताविकातून, राजयोगिनी ब्र. कु. छाया बहेनजी यांनी ब्रह्माकुमारी विद्यालयात चालणाऱ्या विविध कार्याची माहिती देऊन होलोग्राफिक ज्योतिर्लिंगाची विशेषता स्पष्ट केली.

सदरील कार्यक्रमाचे आभार राजयोगी ब्र.कु. जितेंद्र कोव्हाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गजानन बिराजदार सर, बालाजी पुणे, ज्ञानोबा गायकवाड, सतिश लोहारे आणि सर्व ब्रह्माकुमारी परिवार माता भगिनींनी परिश्रम घेतले.

## श्रीमती जाधव पी. पी. यांना जिल्हा स्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



अहमदपूर दि.०९(कारामुंगीकर) तालुक्यातील ळिीक्षस८९५८मौजे धानोरा (बु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका श्रीमती जाधव पुष्पा प्रभाकर यांना नुकताच जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांचा शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष, धानोरा (बु.) उद्योजक शेख नय्युम यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत येणाऱ्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या मार्फत व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड जिल्हा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या नवोपक्रम सादरीकरण स्पर्धेत श्रीमती जाधव यांच्या नवोपक्रमास पारितोषिक प्राप्त झाले. श्रीमती जाधव यांनी शालेय परिपाठातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या विषयावर नवोपक्रम सादर केला होता. या यशाबद्दल शालेय शिक्षण समितीचे माजी अध्यक्ष श्री नय्युम यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष, सदस्य सर्व कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी

## कबीरवाणी

**धन रहें न जीवन रहैं,**
**रहैं न गाँम न ठाँम..**
**कबीर जग में जस रहैं,**
**करिदे किसी का काम**

**भावार्थ** : संत कबीर म्हणतात कि, ना शेवटी धन राहणार नाही, ना तारुण्य राहणार नाही. घरही राहणार नाही. या शाश्वत जगात केवळ आपण केलेले कार्य आणि यश हेच राहणार आहे. म्हणून कोणाचेही नेहमी कल्याण करावे. या जगतात सर्व काही जे मानवास मिळालेले आहे ते सर्वकाही एके दिवशी नष्ट होणार आहे. यासाठी जीवनभर जी आपण मरमर करतो, काहींतरी प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. इर्षा, मत्सर, व्देश बाळगतो, छोट्याश्या स्वार्थापायी दुसऱ्यांना दुःखी करतो. तर हे सगळे कश्यासाठी करतो यावर विचार करावयास लावणारा हा संत कबीरांचा हा दोहा आहे.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# येरगी बालिका पंचायत राज समितीचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्मान



देगलूर(प्रतिनिधी): नांदेड येथे आज जागतिक महिला दिनानिमित्त बेटी बचावो बेटी पढावो अभियान अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन नगरी येरगी ग्रामपंचायत चे सरपंच,ग्रामविकास अधिकारी,सदस्य आणि बालिका पंचायत राज समितीचे सर्व सरपंच, उपसरपंच, सदस्य यांचा नांदेड जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला .


यावेळी जिल्हाधिकारी अभिजित राऊत ,नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल , पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे , महानगरपालिका आयुक्त सुनील लहाने यांनी येरगी ग्राम पंचायत आणि बालिका राज पंचायत चा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला व शुभेच्छा दिल्या.

नांदेड जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत क्षेत्रात बालिका पंचायत राज ची स्था-पना करून शालेय मुलींमध्ये समाजात वावरण्याचे व विविध उपक्रम राबविण्याचे धाडस यावे म्हणून बालिका पंचायत राज ची स्थापना केली. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्वप्रथम येरगी ग्रामपंचायत ने बालिका पंचायत राज ची स्थापन करून गावात बेटी पढाओ बेटी बचाओ, व्यसनमुक्ती ,अंधश्रद्धा निर्मूलन,प्रत्येक रविवारी स्वच्छता अभियान,महिला व बालिकांच्या आरोग्याची काळजी याविषयी विविध अभियान राबविण्यात आले. त्याची दाखल घेऊन नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने सदरील पुरस्कार आज बालिका पंचायत राज आणि ग्रामपंचायत ला एका विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.

या सत्कार समारंभात बालिका पंचायत राज ची सचिव महादेवी दाणेवार हिने मनोगत व्यक्त केले त्यास उपस्थितांनी दाद दिली .

यावेळी या समारंभास संजय गाधी निराधार अनुदान समिती चे अध्यक्ष संतोष पाटील, सरपंच सौ.संगीता मठवाले , ग्रामविकास अधिकारी राजेश तोटावाड, जिल्हा परिषद शाळा येरगीचे शिक्षक ईश्र्वर वाडीकर, पर्यवेक्षका आचेमवार, आगणवाडी सेविका दारलावार , धनाजी जोशी, येरगी बालिका पंचायत राज कार्यकारणी सरपंच योगिता वाघमारे, उपसरपंच नागमणी बरसमवार, ग्रामसेवक महादेवी दाणेवार, ग्रामपंचायत सदस्य रूद्राणी चेंडके, पुनम सुर्यवंशी, महादेव गादगे, श्रीदेवी धाकपाडे, शिवकांता भुरळे, अंजली वाघमारे, स्वाती बरसमवार, तंटामुक्ती अध्यक्ष शिवानी मठपती, राजु सोमावार, हणमंत दाणेवार आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत लातूरमधील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राला १५ लाखांचे बक्षिस



लातूर/प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धेत ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र लातूर जिल्यतुन प्रथम तर विभाग स्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मुंबई येथे आयोजित सोहळ्यात माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या उपस्थितीत, शालेय शिक्षणमंत्री मा.ना दीपक केसरकर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि १५ लाख रूपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी वातावरण निर्माण व्हावे, शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी. यादृष्टीने या स्पर्धा आयोजित करण्या मागचा उद्देश आहे असे यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय विभागाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान दि ०१ जानेवारी ते दि १५ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात आले होते. स्पर्धेसाठी ठरवुन दिलेल्या निकषांच्या माध्यमातून विविध समित्यांकडून ५ स्तरावर तपासणी करण्यात आली. शाळा शाळां मधील स्पर्धात्मक वातावरणतून गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी अधिकचे प्रयत्न होतील हा यापाठीमागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

२४ वर्षांपासून बालशिक्षणात काम करणाऱ्या ज्ञानप्रकाशमध्ये अगदी सुरूवातीपासून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वच बाबी अगदी जाणीवपूर्वक केल्या जातात .संस्थापक सतीश नरहरे आणि संचालिका, मुख्याध्यापिका सविता नरहरे आनंददायी शिक्षणावर सातत्यपूर्ण प्रयोग करत आहेत. त्यामुळे साहजिकच या गोष्टींमध्ये पात्र होऊन लातूरमध्ये बालशिक्षणात काम करणारा शैक्षणिक व सामाजिक प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राने खाजगी शाळांतून लातूर विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.मोठ्या वर्गासाठी गाजलेल्या लातुर पॅटर्न मध्ये बाल शिक्षणात काम करणाऱ्या ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राने स्वतःचा एक पॅटर्न निर्माण केला आहे. सृजनशील, आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेऊन प्रयोगशील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राचे आस्थेने धडपडणारे शिक्षक, उत्कट प्रतिसाद देणारी मुलं आणि पालक व सर्व हितचिंतक व प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी तसेच शिक्षण विभागातील सर्व अधिकार्यांचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे व मु. अ. सविता नरहरे यांनी याप्रसंगी मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त केले. हा पुरस्कार प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे व मुख्याध्यापिका सविता नरहरे यांनी स्विकारला. यावेळी लातूर विभागाचे उपसंचालक गणपत मोरे, गटशिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, शालेय समिती सदस्य विशाल माळेगावकर व प्रभाकर हिप्परगे व शिक्षक प्रतिनिधी वसंत पाटील, प्रशांत शिंदे, कल्पना येनगे, माधवी मिरजकर, उत्तरा दिवाण, संपदा पांडे, भाग्यश्री स्वामी, विश्वजीत पांचाळ, प्रदिप शिंदे, प्रकाश टिमके हे उपस्थित होते.

# जलयुक्त शिवार चळवळीत ग्रामस्थ आणि युवकांचा सहभाग महत्वाचा : डॉ. करजगी

लातूर / प्रतिनिधी- मराठवाड्यातील पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून पाणी व्यवस्थापनासाठी जलयुक्त शिवार चळवळीची आपण सुरुवात केली आहे या चळवळीत ग्रामस्थ आणि युवकांचा सहभाग महत्वाचा असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नित राष्ट्रीय सेवा योजना, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, जवळा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष युवक शिबिर मौजे जवळा बु. येथे आयोजित करण्यात आले आहे या शिबिरात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रत्नाकर बेडगे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. नरेश पिनलकर, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. किसनाथ कुडके यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. करजगी म्हणाले की, छत्रपती शिवरायांचे गडकोट किल्ल्यावरील जल व्यवस्थापन वैशिष्ट्यपूर्ण असे होते. छत्रपती शिवराय हे कृषिरक्षक होते. त्यामुळेच त्यांना रयतेचा राजा असे संबोधले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महात्मा गांधी, संत गाडगे महाराज, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक थोर महात्म्ये आणि राष्ट्रपुरुषांच्या विचारधारेवर चालणारे सुजान, सक्षम आणि सुदृढ तरुण तयार करण्याचे काम करीत आहे. तरुणाने समाजातील अनेक प्रश्न, आव्हाने यांचा सूक्ष्म अभ्यास करून गाव, शहर विकासाकरिता संघटन शक्ती दाखवावी असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. नरेश पिनलकर म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण हे देशाची संस्कृती, देशाची भाषा, देशाचा भव्य दिव्य इतिहास जतन करणारे आहे. पारंपरिक शिक्षणातील साचेबद्धपणा कमी करून भारतीय ज्ञान व्यवस्था अधिक बळकट करणारे आहे. यातून कौशल्याधिष्ठित, आत्मनिर्भर आणि विकसित भारताकरिता तरुणांची पिढी तयार होईल असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. सुभाष बेंजलवार म्हणाले की, स्व भान ठेवून योजना आखणारी आणि बेभान होऊन काम करणारी पिढीच देशाचे भविष्य आहे. उद्याचा भारत अधिक सुजलाम् आणि सुफलाम् करण्यात रासेयो स्वयंसेवक यांचा वाटा मौलिक असणार आहे. समाजसुधारणेच्या कार्यासाठी धडपडणारी ही पिढी नक्कीच देशाला उज्ज्वल भविष्य देतील असे ते म्हणाले.

# प्रसेना प्रतिष्ठान मध्यवर्ती भीमजयंती समितीची कार्यकारिणी जाहीर

धाराशिव (प्रतिनिधी) - महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रसेना प्रतिष्ठान मध्यवतीर्् भीमजयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्षपदी निखिल शिंदे, उपाध्यक्ष आकाश वाघमारे तर सचिवपदी रूपेश बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रसेना प्रतिष्ठान मध्यवर्ती भीमजयंती उत्सव समितीच्यावतीने विविध उपक्रम व मिरवणूक उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी निखिल शिंदे, उपाध्यक्ष आकाश वाघमारे, सचिव रूपेश बनसोडे, सहसचिव शमीत सरवदे, कार्याध्यक्ष जीवन भालशंकर, कोषाध्यक्ष प्रज्योत बनसोडे, प्रसिध्दीप्रमुख अजिंक्य जानराव, शैलेश गडबडे, सांस्कृतिक प्रमुख सोनू सरवदे, शाहूराज धावारे, विशाल सरवदे, धन्यकुमार क्षीरसागर, शब्बीर शेख, अजित बनसोडे, सल्लागार कुमार ओहळ, राजाभाऊ जानराव, आनंद विधाते, करण वाघमारे, महेश ओहळ, मिरवणूक प्रमुख महादेव भोसले, पृथ्वीराज सरवदे, चेतन माळाले, अमर विधाते, कैलास लोंढे, सचिन डोंगरे, सुमित क्षीरसागर, प्रीतम शिंगाडे, अक्षय बनसोडे, महेश डावरे, मनोज वाघमारे,विशाल बनसोडे, मार्गदर्शक म्हणून अरुण बनसोडे, कमलाकर बनसोडे, खंबीर साथ बाळासाहेब बनसोडे, निलेश भोसले, श्याम जहागीरदार, संयोजक नागराज साबळे, शैलेंद्र शिंगाडे, आयोजक म्हणून संदीप बनसोडे यांची सर्वानुमते निवड झाली आहे.




# पश्चिम बंगालमधील मोगलाई विरोधात दलित संघटना आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना पाठविले निवेदन



लातूर : पश्चिम बंगालमधील संदेशखाली येथे अनुसुचित जाती जमाती तसेच आदिवासी समाजाची ८०० बिघा जमीन हडप करून आमच्या माता-भगिनींनवर अमानवीय लैंगीक अत्याचार वारंवार होत आहेत. त्याबाबत पोलीसात तक्रार देवूनही अजुन देखील तेथील तृणमुल कॉंग्रेसच्या अन्नमंत्र्यांच्या जवळचा कुख्यात नेता शहाजहॉंन शेख व त्याचे पाळीव गुंड सियाउद्दीन शेख, घियासुद्दीन गाझी, शिबु हजरा, उत्तम सरदार आणि लल्लु घोष या पदाधिकार्यांवर ॲट्रोसिटीचे गुन्हे दाखल झालेले नाहीत. ते त्वरीत झाले तरच आम्ही व आमच्या अनुसूचित जाती जमातीच्या समाज भगिनीं तेथे केस लढण्याची हिंमत ठेवू शकतील. केंद्र शासनाने या प्रकरणात त्वरीत लक्ष घालावे व यांच्यावर कडक कारवाई करावी यासाठी महामहीम राष्ट्रपती यांना लातूर जिल्हाधिकार्यांमार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे .

अनेक परिवारांमधील मुली, महिला यांच्या अब्रुचे धिंडवडे काढले जात आहेत. तरी देखील तेथील सर्व महिलांची नावे गुप्त ठेवून त्यांच्या मुलाखती घेतल्या जाव्यात. वरील सर्व नराधमांनी या बलात्कारांचे, जमीनी हडपण्यासंबंधीचे गुन्हे केले. या सर्वांना या गावातील महिलांची जातीची माहिती असुनसुध्दा हा अन्याय केला. तरी शासनाने यांच्यावर ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल केले नाहीत. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हे गाव भारताच्या सिमावर्ती प्रदेशात असल्यामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षा लक्षात घेता त्यांनी हडपलेल्या जमीनीचा वापर राष्ट्रद्रोही कार्यासाठी केला जाऊ शकतो. सदर प्रकरणाचे गांर्भीय लक्षात घेवून वरील सर्वांचे लागेबांधे तपासले जावेत व त्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्यावी. जे दोषी आढळतील त्यांच्यावर लवकरात लवकर कारवाई करावी. एकूणच पश्चिम बंगालमधील हाताबाहेर गेलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बघता व अराष्ट्रीय कारवायांकडे राज्य सरकारने केलेले दुर्लक्ष अक्षम्य असुन पश्चिम बंगालमधील सरकार राज्य सांभाळण्यास समर्थ दावेदार होवू शकत नाही. तरी लवकरात लवकर राष्ट्रपती राजवट या राज्यात लागू करावी अशी मागणी जिल्हाधिकार्यांमार्फत पाठविण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शुक्रवार दि.८ मार्च रोजी जागतिकस्तरावर महिला दिन साजरा करण्यात आला. पश्चिम बंगालमधील महिला आजही बाराव्या शतकाप्रमाणे मोगलाईचे जीवन जगत आहेत. त्यांच्या आयुष्यात स्वातंत्र्याचे वारे कधी वाहतील हा समस्त महिला जातीसमोरचा प्रश्न आहे. त्यामुळे अशा नराधमांना शिक्षा झाल्याखेरीज खरा महिला दिन साजरा होणार नाही. यावेळी सामाजिक समरसता मंचाचे पदाधिकारी निलेश गदरे, डॉ. संतोष जमदाडे, शाम बलुतकर, लक्ष्मीकांत कुलकर्णी. विश्व हिंदु परिषद बजरंग दलाचे पदाधिकारी ॲड.गौरीशंकर कौळखेरे, ॲड. प्रणव रायचुरकर, सुर्यासिंग राजपुत, मनिष कडेल, गोविंद वर्मा, दिनेश प्रयाग, गणेश छत्रे. मातृशक्तीच्या सौ.आरती पवार, जनाधार संस्थेचे संजय कांबळे, सौ.छायाताई शिंदे, संगीता मगर, मातंग एकता परिषदेचे दिपक चाबुकस्वार. अधिवक्ता परिषदेचे ॲड.प्रणाली रायचुरकर. विवेक विचारमंचचे दत्ता मस्के, प्रदिप सावळे, सुरज लोकरे, सचिन लांबोटे. राष्ट्रीय सेविका समितीचे शुभांगीताई शेळगावकर. महिला समन्वय समितीचे निशा सुर्यवंशी, विजयाताई हुरदुळे, श्वेता देशपांडे. भारत विकास परिषदेचे मृणाल कुलकर्णी, श्वेता आयाचित यांच्यावतीने जिल्हाधिकार्यांमार्फत महामहीम राष्ट्रपतींना निवेदन पाठविण्यात आले.

# संजय शेटेंच्या नेतृत्वात लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस नक्कीच मजबूत होईल : जयंत पाटील



लातूर : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) चे नूतन लातूर जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे संघटन नक्कीच मजबूत होईल असा विश्वास राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी लातूर बोलताना व्यक्त केला.

लातूरमध्ये गुरुवारी सकाळी आ. जयंत पाटील यांच्या हस्ते राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्यालयाचे म राष्ट्रवादी भवनफ चे उद्घाटन राजीव गांधी चौकातील चौंडे कॉम्प्लेक्स याठिकाणी थाटात पार पडले. त्यावेळी आ. पाटील आपले मनोगत व्यक्त करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील हे होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, जिल्हाध्यक्ष संजय शेटे, शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार,सक्षणा सलगर, मदन काळे, बापूसाहेब उजेडकर, पूजा मोरे, सुशीला मोराळे , नीळकंठ मिरकले, सोमेश्र्वर कदम, रफिक शेख, रेखा कदम, स्नेहा मोरे, शिवाजी मुळे , माधव गंगापूरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आता. जयंत पाटील यांनी स्वबळावर राष्ट्रवादीचे जिल्हा कार्यालय सुरु केल्याबद्दल जिल्हाध्यक्ष संजय शेटे अभिनंदन केले. लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस केवळ उदगीर आणि अहमदपूर तालुक्यापुरती मर्यादित न ठेवता ती जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या घोषित करण्यापूर्वी गावागावात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कमिट्या जाहीर करून संघटन वाढविण्याचे आवाहन केले. संजय शेटेंच्या नेतृत्वावर लातूर जिल्ह्यात आपला पक्ष नक्कीच मजबूत होईल असा विश्र्वासही आ. पाटील यांनी व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांनी यावेळी आपण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्विकारल्यापासून जिल्हाभरात आलेले आपले अनुभव कथन केले. राष्ट्रवादीचे जिल्ह्यातील केवळ दलाल कार्यकर्ते अजित पवारांसोबत सर्वच्या सर्व कार्यकर्ते शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पक्षासाठी स्वतःला झोकून द्यायला तयार असल्याचे सांगितले. पक्षाने आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीचे आपण नक्कीच सोने करू. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उदगीर आणि अहमदपूरच्या जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे खेचून आणल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नसल्याचे सांगून संजय शेटे यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीही आपण सज्ज असल्याचे सांगितले. बसवराज पाटील नागराळकर , राष्ट्रवादीच्या युवा नेत्या सक्षणा सलगर यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप विनायकराव पाटील यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. केशव अलगुले यांनी तर आभार प्रदर्शन बख्तावर बागवान यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्रवादीचे जिल्हाभरातील कार्यकर्ते , पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील मूलभूत रसायनशास्त्र या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस,बेंगळुरू,आयएनएसए, नवी दिल्ली आणि एनएएसआय, प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने ०५ ते ०६ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान अकादमीच्या मूलभूत रसायनशास्त्र या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,प्रमुख पाहुणे म्हणून हैदराबाद विद्यापीठातील स्कुल ऑफ फिजिक्सचे माजी प्रा.आनंद पाठक,रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,कार्यशाळा समन्वयक डॉ.नंदिनी कोरडे,प्रा.राहुल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी साधन व्यक्ती प्रा.आनंद पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना आरोग्य ही संपत्ती आहे तर ज्ञान ही शक्ती आहे,असे सांगून जीवनात अथक परिश्रम व अभ्यास केला पाहिजे. कार्यशाळेतील ज्ञानाचा उपयोग भावी आयुष्य घडविण्यासाठी व समाजासाठी केला पाहिजे.

रामायण व महाभारतातील पात्रांचा आदर्श घेऊन जीवनात यश मिळविले पाहिजे,असे त्यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोप करत असताना उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी मूलभूत ज्ञान असल्याशिवाय ज्ञानामध्ये वृद्धीच होत नाही,त्यामुळे बेसिक ज्ञान अशा कार्यशाळांमधून घेऊन नवीन शैक्षणिक धोरणात वाटचाल केली पाहिजे,असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगप्रकाश दरगड यांचेही प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले.समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या नागटिळक व विद्युला राजमाने यांनी संयुक्तरित्या केले तर आभार कार्यशाळा समन्वयक डॉ.नंदिनी कोरडे यांनी मानले.

यावेळी गितांजली केसरे,अनुष्का कुलकर्णी,गौरी कन्हेरे,गिता औटी व ओमकार पवार या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील अनुभव सांगितले. याप्रसंगी प्रा.नवनाथ ढेकणे, प्रा.भाग्यश्री काळे, प्रा.मनीषा मुंडे,डॉ.रामशेट्टी शेटकार,प्रा. अच्युत शिंदे,प्रा.राहुल धवसे यांच्यासह जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा.गोपाल अवस्थी,डॉ.सुरज कोल्हे,डॉ.श्रेयस माहुरकर,डॉ. रवींद्र शिंदे,डॉ.ईन्नूस पठाण यांच्यासह सर्वांचे सहकार्य लाभले.

# विश्व पब्लिक स्कूल येथे महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सत्कार



देगलूर(प्रतिनीधी): जागतिक महिला दिनाच्या औचित्याने येथील विश्र्व पब्लिक स्कूलमध्ये आपली लेकरं व कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे सांभाळत आपल्या शिक्षणाचा उपयोग करून घराच्या चौकटी ओलांडून समाजाच्या विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असणाऱ्या महिला पालकांचा विशेष सत्कार सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. शोभा भूमे व शिक्षणतज्ञ एच. एस. खंडागळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. कविता विजय पाटील, डॉ. शितल मधुकर बिरादार, डॉ. राजश्री बालाजी बिरादार, शिक्षिका सौ. हर्षा बालाजी कलेटवाड, सौ. रूपाली रामलिंग मंडलापूरे व परिचारक सौ. मनिषा बोदे-खिरे यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. शोभा भूमे यांनी सांगितले की आज महिला या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य व सर्वच क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून यशस्वीपणे काम करत आहेत. म्हणून महिलांना योग्य संधी दिली तर त्या संधीचे ते नक्कीच सोने करतात असा आशावाद व्यक्त केला. तर एच. एस. खंडागळे यांनी विश्र्व पब्लिक स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविल्या जात असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन सर्व शिक्षिकांचे कौतुक केले. खचज- ऑलंपियाड परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा याप्रसंगी गोल्ड मेडल देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शाळेसाठी अत्यंत तळमळीने मेहनत घेणाऱ्या व विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या सर्व शिक्षिकांचे सुद्धा याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विशेष स्वागत सत्कार करण्यात आले.यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या संजिवनी सुर्यवंशी, डॉ. मधुकर पाटील, डॉ. विजय पाटील, उमाकांत स्वामी, बालाजी कलेटवाड, दत्तात्रय टोम्पे, किशोर खिरे, जीवन कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास येसगे कावळगावकर यांनी तर प्रास्ताविक विश्व पब्लिक स्कूलच्या संचालिका आम्रपाली येसगे यांनी केले.

### राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जळकोट ता. अध्यक्षपदी संग्राम हासुळे पाटील

जळकोट / प्रतिनिधी- तालुक्यातील शेलदरा येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते मंत्री ना. संजय बनसोडे यांचे कट्टर समर्थक संग्राम हासुळे पाटील यांची नियुक्ती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जळकोट ता. अध्यक्षपदी करण्यात आली आहे. तसे पत्र राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख यांच्या स्वाक्षरीने त्यांना ता. ८ मार्च रोजी देण्यात आले. हासुळे पाटील यांच्या निवडीबद्दल राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे, राष्ट्रवादीचे माजी तालुका अध्यक्ष अर्जुन आगलावे पाटील बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, नगरपंचायतचे गटनेते ड तात्या पाटील, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे सचिव विनायक जाधव, राष्ट्रवादीचे जळकोट शहराध्यक्ष अशोक डांगे, माजी जि. प. सदस्य चंदन पाटील नागरगोजे, बाजार समितीचे माजी संचालक गजानन दळवे, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष सत्यवान दळवे, दिलीप कांबळे, श्रीकृष्ण पाटील, मंगेश गोरे आदींनी अभिनंदन केले आहे.

# महिलानी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यातुन सक्षम बनल्याचे दाखवीले :डॉ. सुर्यवंशी



शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी: महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यातुन सक्षम बनल्याचे दाखविले आहे . पृथ्वी ते अंतराळा पर्यंत महिलांनी गगण भरारी केवळ शिक्षणा मुळेच घेतल्याचे दिसून येते . महिलांनी शरीराने मजबूत न बनता मनाने ही मजबूत बनावे ,अखिल मानव जातीला जन्म देणारी ही महिलाच आहे. त्यामुळे महिलां अनेक क्षेत्रात चांगले कार्य व सक्षम कामगीरी करीत आहेत .

असे प्रा . डॉ एन बी सुर्यवंशी यांनी येथील शिवनेरी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग , महिला तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ९ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक हॉलमध्ये आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभाग प्रमुख डॉ एन बी सूर्यवंशी हे होते . या वेळी प्रमुख पाहुण्या महिला तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. जे . यु शिंदे मॅडम, प्रा .वर्षा खरोबे मॅडम, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ पांडूरंग मुठ्ठे , डॉ उज्वला पाटील मॅडम यावेळी व्यासपीठावर उपस्थीत होते .

यावेळी आनेक विद्यार्थीनीने महिला दिना निमित्त आपले मनोगत व्यक्त केले . यावेळी महिला प्राध्यापकांचा पुष्प गुच्छे देऊन सत्कार करण्यात आला . या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रासेयो चे कार्यक्रम अधिकारी तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ पांडूरंग मुठ्ठे यांनी केले तर सुत्रसंचालन कु सुप्रिया पाटोळे यांनी केले तर आभार प्रा . वर्षा खरोबे यांनी मानले .

# स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

## आकाश, ओंकार, रणजित, विशाल यांनी गाजविला उद्घाटना दिवस

उदगीर : लातुरचा आकाश गट्टे, अहमदनगरचा ओंकार रोडगे, कोल्हापूरचा रणजित पाटील व सोलापूरचा विशाल सुरवसे या मल्लांनी आपापल्या वजनी गटातील कुस्त्या जिंकून स्वर्गिय खाशाबा जाधव राजस्तरीय कुस्ती स्पर्धेत शनिवारचा उद्घाटनाचा दिवस गाजविला.

उदगीर येथे शनिवारी या बहुचर्चित स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेला दिमाखदार वातावरणात प्रारंभ झाला. उदगीर तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर राज्य शासनाच्या क्रीडा व युवक संचालनालयाच्या वतीने स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

अहमदनगरचा ओंकार रोडगे आणि गौरव मोहिते यांच्यातील ५५ किलो गटातील लढतीने स्पर्धेची सलामी झडली. ओंकारने या एकतर्फी लढतीत गौरवला १०-२ गुण फरकाने लोळविले. याच गटात कोल्हापूरच्या रणजित पाटीलने नाशिकच्या तुषार घारेचा १०-० गुण फरकाने धुव्वा उडवित रूबाबदार विजयारंभ केला.

५७ किलो गटातील चूरशीच्या कुस्तीत सोलापूरच्या विशाल सुरवसेने कोल्हापूरच्या ओंकार पाटीलचा १२-९ गुणफरकाने पराभव केला. ओंकारने पहिल्या फेरीत ९-३ अशी जोरदार मुसंडी मारली होती. मात्र, विशालने दुसर्या फेरीत ९ गुणांची कमाई करीत बाजी मारली, हे विशेष. याच गटात लातूर येथील आकाश गट्टेने अहमदनगरच्या ओम वाघवर ६-० गुण फरकाने विजय मिळवित आगेकूच केली.

### कुस्त्या बघण्यासाठी ६ स्क्रिनची सोय

ही स्पर्धा बघण्यासाठी आलेल्या कुस्तीशौकिनांसाठी सुलभतेने कुस्त्या पाहता यावी यासाठी जवळपास ४००० प्रेक्षक बसतील अशी स्वतंत्र आसन व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर प्रेक्षकांना चालू असलेल्या कुस्त्या पाहण्यासाठी सहा मोठ्या स्क्रिनची सोयदेखील करण्यात आली आहे. त्यामुळे उपस्थितीत कुस्तीप्रेमींना मोठा आनंद झालाय.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

यशवंत धाराशिव जिल्हा
रविवार दि. १० मार्च २०२४


कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार गायकवाड यांना जाहीर



धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – साहित्यिक लेखक कवी, दलित चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पर्यटन विकास समितीचे सदस्य विजय गायकवाड यांना समाज कल्याण विभागाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पर्यटन विकास समिती व कला आविष्कारच्यावतीने शाल, पुष्पहार व शाही टोपी घालून सत्कार करण्यात आला. तर विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधान उद्देशिका समाज बांधवांच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याबद्दल माहिती देण्यात आली. यावेळी पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष युवराज नळे, डॉ. अभय शहापुरकर, सचिव देविदास पाठक, ए.एन. देशमुख, दलित मित्र शंकर खुने, अब्दुल लतिफ, राजेंद्र अत्रे, हणुमंत पडवळ, शेषनाथ वाघ, गणेश वाघमारे, बाबासाहेब गुळीग, विक्रांत नळे, निश्चल बोंदर, प्रदीप वाघचौरे, राजेंद्र धावारे, संजय गजधने, दिपक पांढरे, श्रीकांत गायकवाड, गणेश वाघमारे, संदिप कटाबु, सोमनाथ गायकवाड, कैलास शिंदे, महादेव एडके, दुष्यंत बनसोडे आदी उपस्थित होते.

# भाजपवाले महाराष्ट्राची लूट करीत आहेत – उध्दव ठाकरे



तुळजापूर दि.९ (प्रतिनिधी) – माझ्या भवानी मातेने संकट काळी महिषासुर दैत्याचे मर्दन केले होते ती जगदंबा आता या हुकमशहा दैत्याचे नक्की मर्दन करेल असे सांगून ज्या शिवरायांनी सुरत लुटली त्याच शिवरायांचा महाराष्ट्र हे भाजपवाले लूट करीत असल्याचा घणघणाती आरोप शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केला.

तुळजापूर येथे जनसंवाद यात्रेनिमीत्त आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी शिवसेना नेते खा. संजय राऊत , विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मिलींद नार्वे कर, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे,
खा. ओमराजे निंबाळकर, आ कैलास पाटील, सहसंपर्क प्रमुख नंदुराजे निंबाळकर, माजी उपजिल्हाप्रमुख शाम पवार, कमलाकर चव्हाण, अमीर शेख, महिला आघाडीच्या जिल्हा समन्वयक शामलताई वडणे – पवार, उपतालुका प्रमुख सुनिल जाधव, शहरप्रमुख सुधीर कदम, अमीर शेख आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना ठाकरे म्हणाले की, राज्यातील सेमी कंडक्टरचे दोन प्रकल्प यांनी गुजरातला पळविले. सध्या सोयाबीन, कापसाला व शेतकऱ्यांच्या शेत मालाला भाव नाही. परंतू गद्दारांना मात्र भाव असल्याची खोचक टिका त्यांनी शिंदे सेनेवर केली. तसेच शेतकऱ्यांवर बंदुक रोखणारे, अश्रुधुर सोडणारे हे सरकार शेतकऱ्यांना हमी भाव देईल असे वाटते का ? असा सवाल त्यांनी उपस्थितांना केला. तसेच आम्ही दोन लाख रुपयांपर्यत शेतकऱ्यांच्या कर्जमाफी केली होती असे सांगून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांनी मोदींना कचऱ्याच्या टोपलीत घालायला निघाले होते. तेव्हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना वाचवले हे उपकार विसरणारे ही मंडळी असल्याचा थेट आरोप त्यांनी प्रधानमंत्री मोदींवर केला. तर आमचे हिंदूत्व हे घंटा वाजवणारे नाही तर अतिरेक्यांना बडवणारे हिंदूत्व असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आता
धार्मिक प्रचार केला तर कारवाई करा असा फतवा काढण्यात आला. प्रथम कर्नाटक निवडणुकीत यांनी बजरंग बली की जय म्हणा व मतदान करा असे सांगितले होते. त्यामुळे प्रथम त्यांच्यावर कारवाई करा असे आवाहन त्यांनी निवडणूक आयोगाला करुन १९९० च्या काळात अटलबिहारी बाजपेयी प्रधानमंत्री असताना हिंदुत्वाचा प्रचार केला म्हणून शिवसेनाप्रमुख प्रमुख कै. बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला होता अशी आठवण त्यांनी करुन दिली. मात्र सध्याचे सरकार अधिकाराचा गैरवापर करुन कारभार हाकत असून आम्ही मोडणारे नाहीत तर वाकवणारे असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे यांनी माझ्या आजोबांनी स्थापन केलेला पक्ष हिसकावून घेतला. सर्वोच्च न्यायलयात दाद मागतच आहोत. पण आता तुमच्या न्यायालयात आलो असून आता तुम्हीच आम्हाला न्याय द्या असे आवाहन त्यांनी केले. या निवडणूकीत लोकशाही वाचणार की नाही ? हे स्पष्ट होणार आहे आता आम्ही जनतेचा न्यायालयात जाणार असून जनता मला नक्की न्याय देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मी जगदंबेची शपथ घेऊन सांगतो की, शिवसेनाप्रमुख कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या खोलीत अमित शहांनी अडीच वर्ष शिवसेनेला मुखमंत्री पद देण्याचा शब्द दिला होता. तो त्यांनी पाळला नाही असे सांगत भाजपने आमच्या पाठीत खंजीर खुपसल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आपल्या भाषणातुन सताधारी भाजपा सरकारवर चौफर टीका केली. तर खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी देखील त्यांनी पाच वर्षात केलेल्या विकास कामांची माहिती दिली. तसेच भाजपा महायुतीवर जोरदार टिका केली. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव आकाशवाणी केंद्राचे स्थानिक प्रसारण पूर्ववत सुरू - खा. राजेनिंबाळकर



धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – आकाशवाणी धाराशिव हे Local Radio Station (LRS) योजने अंतर्गत सन १९९६ ला सुरुवात झालेले केंद्र आहे. या केंद्राला मागील २७ वर्षात अनेक गुणवत्ता पुरस्कार मिळाले असून राज्यातील इतर काही आकाशवाणी केंद्राच्या तुलनेत आकाशवाणी धाराशिवने जाहिरातीव्दारे सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल ही दिलेला आहे. परंतू मागील दोन वर्षापासून सायंकाळच्या सभेत मराठी भाषेतील स्थानिक कार्यक्रमांचे प्रसारण बंद करून मुंबईचे हिंदी भाषेतील कार्यक्रम लादल्या मुळे श्रोत्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला होता, शिवाय स्थानिक कलावंत, गुणवंत विद्यार्थी, महिला युवक– युवती, जाहिरातदार यांना हक्काच्या व्यासपिठापासून वंचीत रहावे लागल होते. श्रोत्यांची आणि मराठी भाषेची झालेली ही गळचेपी लक्षात घेता खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मराठी भाषा गौरव दिनी अर्थात २७ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील आकाशवाणीच्या पश्चीम विभागाचे महानिदेशक कंबलियाल यांची भेट घेवून धाराशिव आकाशवाणी केंद्राच्या सायंकाळच्या प्रसारण सभेत सर्व स्थानिक कार्यक्रम पुन्हा सुरु करण्याची सुचना केली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे दि.१ मार्चपासून आकाशवाणी धाराशिव केंद्राच्या सायंकाळच्या प्रसारण सभेत मराठी भाषेतील स्थानिक कार्यक्रम सुरु झाले आहेत. यामुळे गावोगावी असणाऱ्या भजनी मंडळ, आराधी मंडळ, भिमगितं, धनगरी ओव्या भारुड यासारख्या लोकसंगीत कला प्रकारांना आणि कलाकरांना, तसेच गुणवंतना पुन्हा एकदा हक्काच शासकीय विचारपीठ उपलब्ध झाले आहे.




## दोन दिवशीय उद्योग मार्गदर्शक विकास कार्यक्रमास प्रतिसाद



धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय व भारतीय युवा शक्ती ट्रस्ट पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने दोन दिवसीय मार्गदर्शक विकास कार्यक्रमास प्रतिसाद मिळाला.
धाराशिव शहरातील हॉटेल पुष्पक पार्क येथे दि. ६ व ७ मार्च रोजी मार्गदर्शक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हास्तरावर जास्तीत जास्त उद्योग निर्मितीसाठी मार्गदर्शक तयार करून युवकांना नवीन उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा या मूळ कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उद्योग चालू करून तो स्थिर होण्यापर्यंत ज्या काही अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन
करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी अभियांत्रिकी, कृषी, कला, विज्ञान व फार्मसी या विविध क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. यावेळी बीवायएसटीचे मार्गदर्शक राम शेंडे म्हणाले की, वर्ड, शब्द हे जगाला बदलू शकतात. त्यामुळे आपण कशा पद्धतीने शब्दांचा वापर करतो ? त्यावर बरेचसे यश अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. तर जोपर्यंत तुम्ही कुठल्याही क्षेत्रात झोकून देऊन काम करत नाहीत. तोपर्यंत यश सहजासहजी मिळत नाही. आपल्या प्रत्येकाच्या मनामध्ये कुठलीही गोष्ट करताना ती कशासाठी ? हा प्रश्न निर्माण झाला पाहिजे. बीवायएसटी ही एक ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी संस्था आहे. जी मुख्यत्वे वंचित भारतीय तरुणांना व्यावसायिक कल्पना विकसित करण्यासाठी मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली व्यवहार्य उपक्रमांमध्ये मदत करते. ज्याचा मुख्य उद्देश नोकरी शोधणाऱ्यांना निर्माते बनवणे आहे. मार्गदर्शक आणि संस्थापक अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या जीआरडी टाटा सारख्या दिग्गजांच्या पाठिंब्याने आणि मार्गदर्शनाने, बीवायएसटीची स्थापना पहिल्यांदा नवी दिल्लीत येथे १९९२ ला झाली. बीवायएसटीने बजाज ऑटो, टाटा स्टील, जेके पेपर आणि आयएफसीआय सोबत भागीदारी केली आहे. तर संपूर्ण महाराष्ट्र, ओडिशा आणि एनसीआरमध्ये विस्तार केला आहे. उद्योगासाठी मार्गदर्शक बनायचे असेल तर त्यासाठी लागणारी कौशल्य काय असावेत आणि ते कसे विकसित करावेत ? या विषयांचे सखोल माहिती प्रशिक्षक राम बेंडे यांनी दिली. कार्यशाळेस बीवायएसटीकडून डॉ. अंबड, रोशन अहिरे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील जे युवक उद्योग चालू करू इच्छितात त्यांना हे मार्गदर्शक नक्कीच मार्गदर्शन करतील असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी मत व्यक्त केले. धाराशिवमधील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, तेरणा महाविद्यालय, गव्हर्नमेंट पॉलीटेकनिक, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सबकॅम्पस, जिल्हा उद्योग केंद्र धाराशिव, छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय संभाजी नगर यांचे प्रतिनिधी असे एकूण ६० प्रतिनिधी उपस्थित होते. तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, संस्थेचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील आणि महाविद्यलयाचे समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे यांनी कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले.

## येणाऱ्या निवडणुकीत खा. राजेनिंबाळकर यांची रामभक्तच सत्ता नष्ट करतील

### काळे व ॲड.पाटील यांची टीका




धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – शिवसेनेचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या दोन दिवसांच्या सभेत सोयाबीन भावावरुन प्रभू श्रीराम यांचा तर नोकरीवरून बजरंग बली जयघोष केला आहे. तसेच दैवतांच्या नावाचा उल्लेख करीत हेटाळणी व टवाळकी केली आहे. त्यामुळे आमच्यासह तमाम रामभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. त्या त्यामुळे आम्ही त्यांच्या या व त्याचा जाहीर निषेध करीत असून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये रामभक्तच त्यांची सत्ता नष्ट करतील, असा इशारा भाजपचे धाराशिव लोकसभा मतदार संघाचे अध्यक्ष नितीन काळे व भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य ड मिलिंद पाटील यांनी दि.९ मार्च रोजी दिला.
धाराशिव शहरातील प्रतिष्ठान भवन भाजप कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड खंडेराव चौरे, नेताजी पाटील, राजसिंह राजेनिंबाळकर, शिवाजी पंगुंडेवाले, रामदास कोळगे, अण्णा पवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना काळे म्हणाले की, सोयाबीनचे भाव वाढावेत यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध ठिकाणच्या सभेमध्ये खासदार राजेनिंबाळकर यांनी उपस्थितांना जय श्रीराम म्हणा सोयाबीनचा भाव वाढेल तर नोकरी मिळण्यासाठी जय बजरंग म्हणा नोकरी मिळेल असे सांगत ६०० वर्षांपूर्वीच्या प्रभू श्रीराम व बजरंग बली यांचा अतिशय किळसवाण्या प्रकारे अवमानच केला आहे. प्रभू श्रीराम यांचा इतिहास जुना असून करोडो भारतीयांनी जात-पात व पंथ या पलीकडे भक्तांच्या भावना जुडल्या असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाजाची नक्कल करून त्यांची देखील टिंगल टवाळणी करण्याचा प्रकार केला आहे. विशेष म्हणजे राम भक्त असलेल्या माकडांनी प्रभू श्रीराम यांचे नाव लिहिले आणि ती दगडे जुळून राम सेतू तयार झाला. त्याच रामभक्त माकडांनी रावणाची लंका जाळली. त्याचप्रमाणे २०१९ च्या निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे व भाजपच्या कार्यकर्त्यांनी ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना निवडून आणून खासदार केले असल्याची त्यांनी सांगितले. मात्र तेच राजेनिंबाळकर आज आपल्याला न शोभणारी भाषा बोलत आहेत. त्यांनी तार त्यांनी बाळगायला हवे होते असे नमूद त्यांनी केले. त्यांच्या त्या कृतीचा आम्ही जाहीर निषेध करतो असे सांगत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांना रोखायला हवे होते, असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे सोयाबीनचे भाव वाढावी यासाठी आम्ही देखील प्रयत्न करीत आहोत. तसेच तुरीला १० हजार ७०० रुपये भाव व कांदा निर्यात बंदी उठविली त्याचे त्यांनी का कौतुक केले नाही असा प्रश्न विचारला.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध पुरस्कारांसाठी लातूर जिल्ह्यातील २० व्यक्ती, ६ संस्थांची निवड

लातूर / प्रतिनिधी- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने समाज कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक, व्यक्ती यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षातील या विविध पुरस्कारांचे वितरण मुंबई येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉमांग आर्टस, जमशेद भाभा नाटयगृह, एनसीपीए मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई येथे १२ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तसेच मुंबईचे पालकमंत्री व मुंबई उपनगरचे पालकमंत्री यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. लातूर जिल्ह्यातील एकूण २६ पुरस्कारार्थ्यांची यासाठी निवड करण्यात आली आहे.

सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार या विविध पुरस्कारांची शासनाने घोषणा केली आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील एकूण २६ पुरस्कारार्थ्यांची निवड या चार वर्षांमधील विविध पुरस्कारांसाठी झाली आहे. त्यामध्ये २० व्यक्ती व ०६ संस्थांचा समावेश आहे. सन २०१९-२० मध्ये दोन व्यक्ती व दोन संस्था, सन २०२०-२१ मध्ये आठ व्यक्ती व दोन संस्था, सन २०२१-२२ मध्ये चार व्यक्ती व दोन संस्था व २०२२-२३ मध्ये सह व्यक्ती यांना विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत.

समाज कल्याण क्षेत्रात मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मुलन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराने गौरव करण्यात येत आहे. त्यामुळे समाजातील सर्व स्तरातून शासनाचे आभार व्यक्त करून निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील पुरस्करासाठी निवड झालेल्या सर्व व्यक्ती व संस्थाचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी अभिनंदन केले आहे.

# केंद्रीय कृषी विभागाच्या पथकाची बाभळगावला भेट



**लातूर / प्रतिनिधी:** केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या शेतकरी कल्याण अधिकारी यांच्या पथकाने आज शुक्रवार दि- ०८ मार्च रोजी बाभळगाव या ठिकाणी भेट दिली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत बाभळगाव ग्रामपंचायत महिला सरपंच प्रिया सचिन मस्के यांच्या अध्यक्षतेखाली बाभळगाव ग्रामपंचायत सभागृहात पिक विमा संदर्भात असलेल्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये पिक विमा संदर्भात मार्गदर्शन करताना कृषी मंत्रालय नवी दिल्ली शेतकरी कल्याण अधिकारी औदुंबर चव्हाण यांनी विमा कंपनीला सूचना दिल्या.

तसेच शेतकऱ्यांनी नवीन टोल फ्री क्रमांक १४४४७ चा वापर करावा यावर तक्रारी नोंदविण्यात याव्यात, पिकाची आवश्यक माहिती घ्यावी,मदतीसाठी ॲड अँपचा वापर करावा असे आवाहन करीत विंड पवर हवामान पाऊस याची सूचना मिळते त्यामुळे शेतकऱ्यांना पिकाचे नुकसान होण्यापूर्वी पूर्वतयारी करण्यासाठी वेळ मिळतो,क्राप हेल्थ मॉनिटरिंगकरिता विमा कंपनीकडून गावोगावी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी व्यक्तीची नेमणूक करणार असून पिक विमा भरण्यासाठी शासनाकडून सीएससी सेंटरला प्रति शेतकरी ३० रुपये रक्कम मिळते त्यामुळे शेतकऱ्यांनी विमा भरण्यासाठी सेंटरवर पैसे देऊ नये असेही आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

यावेळी शिवसांब लाडके (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर), दिलीप जाधव (उपविभागीय कृषी अधिकारी लातूर),दिलीप राऊत (तालुका कृषी अधिकारी लातूर),राजू येवले (मंडळ कृषी अधिकारी लातूर),श्रीमती एम.एस. रेनापुरकर (सुपरवायझर व एसबीआय विमा कंपनी प्रतिनिधी) तसेच बाभळगाव ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक शेतकरी, कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान पिक विमा भरण्याच्या वेळी टोल फ्री क्रमांक बंद राहतो साईड चालत नाही, मंडळ, जिल्हा, गावनिहाय पडणारा पाऊस पिक विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांना ग्राह्य धरावा, नैसर्गिक हवामान बदल आपत्ती नुकसान सर्वांना ग्राह्यय राहावे, शेतकऱ्यांना पीक विमा भरण्यासाठी मनुष्यबळ/माहितीगार लोकांची नेमणूक कंपनीने करावी,पिक विमा भरतेवेळी नुकसान प्रकार भरताना माहिती इंग्रजीत आहे ती स्थानिक भाषेत (मराठी) घेण्यात यावी,स्थानिक आपत्ती, पीक जळणे, पेरणी झाली नाही यावर पिकाची जोखीम घ्यावी यासारख्या समस्या उप सरपंच गोविंद देशमुख यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या यावर शेतकरी कल्याण अधिकारी कृषी मंत्रालय नवी दिल्ली औदुंबर चव्हाण यांनी उपस्थित प्रश्नांना समर्पक उत्तरे देत शेतकऱ्यांचे समाधान केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



लातूर / प्रतिनिधी- जेएसपीएम संचलित महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मुंबई, भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य शूश्रूषा वैद्यक शिक्षण मंडळ मुंबई संलग्नित कॉलेज ऑफ नर्सिंग व महाराष्ट्र स्कूल ऑफ नर्सिंग महाविद्यालयातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात काळे हॉस्पिटलच्या डॉ.सुरेखाताई दिनकरराव काळे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून जेएसपीएम संस्थेचे प्रशासकीय संचालक तथा समन्वयक निळकंठराव पवार, शिक्षण संस्थेचे संचालक संभाजीराव पाटील, नर्सिंग महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.शैलेश कचरे, प्राचार्य शिरीन मॅडम, उपप्राचार्य मोहंमद एजाज, असो.प्रोफेसर अझहर शेख, प्रा.नसरीन मॅडम, प्राध्यापक जॉनसन राजपेठे, बुध्दभूषण कांबळे, गोपाळ सूर्यवंशी, महेश घुगे, ऋतुजा पवार, ऋतुराज अंकुशवाड, जागृती कवठेकर, सुरज शिंदे, अमृता राऊत, माधुरी घुले, प्रतिभा कांबळे, ज्योती मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच जीएनएमच्या विद्यार्थीणिंनी महिलांच्या जीवनातील वेगवेगळ्या भूमिका रँप वॉकद्वारे सादर करून महिला जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. याबरोबरच सांस्कृतिक अंकूर महोत्सव २०२४ अंतर्गत वेगवेगळ्या प्रतियोगितेत पारितोषिक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, डॉ.सुरेखा काळे, डॉ.शैलेश कचरे, प्राचार्या शिरीन मॅडम, उपप्राचार्य मोहंमद एजाज यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो.नसरीन बानू मॅडम व जागृती कवठेकर यांनी केले तर आभार महाराष्ट्र नर्सिंग महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.शैलेश कचरे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर अस्पिरेशनच्या वतीने आयोजित व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद




लातूर / प्रतिनिधी- गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग आणि प्रतिबंध या विषयवार मगोष्ट सर्वायकल कॅन्सरचीफ या महितीप्रद व्याख्यानाचे आयोजन रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर अस्पिरेशनच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमात लातूर शहरातील प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ . स्नेहल देशमुख आणि डॉ . वैशाली दाताळ यांनी उपस्थित महिलांना कर्करोगाची कारणे, लक्षणे आणि उपचार याबद्दल सखोल आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी मुलींमध्ये घेण्याची लस आणि त्याची परिणामकारकता याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी क्लबच्या वतीने जगतिक महिला दिनानिमित्त सौ . ज्योती राजेमाने ( योग प्रशिक्षक ), श्रुती मुंदडा ( केक मेकर ), सौ . माधुरी वलसे ( आदर्श शिक्षिका ) आणि सौ . रजनी वैद्य ( हस्त कला प्रशिक्षक ) या समाजातील विविध क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांचा देखील सन्मान करण्यात आला.उपस्थित महिलांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांची भेट देण्यात आली आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सौ. अर्चना लड्डा, आनंदा कोचेटा, स्वर्णिमा कोचेटा, संगीता सोनकवडे, कौशल्या सोनकवडे ,सौ. शकुंतला परदेशी , सोनाली पेन्सलवार , वनिता लाचुरीया, सौ. मैना कावळे , सौ. नीता इंगळे , कविता जोशी , सौ स्मिता दगडे, सौ . अर्चना होळीकर, विजय व्हसाळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जांबुवंतराव सोनकवडे आणि सचिव रो. महेंद्र जोशी , सौ. निर्मला सोमाणी आणि रो . सुधीर ईटकर यांनी मार्गदर्शन केले.

# विज्ञान आणि कला यांचा संयोग साधून पेट्रीआर्टचे नावीन्यपूर्ण प्रदर्शन - प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड



लातूर / प्रतिनिधी: दि ०७ मार्च २०२४ वार गुरुवार रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे पॅट्रीआर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.याचा मुख्य उद्देश सूक्ष्मजीवशात्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती करून देणे,या विषयाबद्दल गोडी निर्माण करणे व सूक्ष्मजीवशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवणे हा होता.या प्रदर्शनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड ,कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.संतोष नापटे व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या शुभ हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

या पेट्रीआर्ट संदर्भात प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी विज्ञान आणि कला यांचा योग साधून नाविन्यपूर्ण असे प्रदर्शन ठेवण्यात आले तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विषयाला इंडस्ट्रीमध्ये,क्लिनिकल रिसर्च सेंटर अशा ठिकाणी खूप संधी आहेत,असे प्रतिपादन यावेळी केले.प्रदर्शना दरम्यान जी स्पर्धा घेण्यात आली होती,या स्पर्धेचे परीक्षण प्रा.संतोष नापटे यांनी केले.या स्पर्धेमध्ये शेख चांद या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक शेख नेहा यांनी मिळविला तसेच घनश्याम जाधव यांनी तृतीय क्रमांक मिळविला.प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १००० हजार,७०० रुपये व ५०० रुपये व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.या प्रदर्शनासाठी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाचे संयोजक प्रा.शितल पाटील यांनी केले तर आभार प्रा.अनुराधा इगळे यांनी मानले.सूत्रसंचालन महेश्वरी कांबळे व सायली यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.महेश करळे,डॉ.दीप्ती ढेरे,प्रा.शैलजा धुतेकर,प्रा. संध्या टेकाळे,प्रा.दीपाली देशमुख,संतोष सूर्यवंशी,शकुंतला हालसे,माधव सूर्यवंशी,अशोक मदने,सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील एम.एस्सी.प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची मदत झाली.या प्रदर्शनासाठी पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.ज्यामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालय व दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व जैवतंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश होता.याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी,विद्यार्थीनीने प्रदर्शनाला भेट दिली.

# जागतिक महिला दिनानिमित्त ऑनलाईन कविसंमलेन उत्साहात संपन्न

नांदेड :(प्रतिनिधी)- जागतिक महिला दिनानिमित्त सोशल मीडियातील साहित्यिक कवी मंडळींचा झूम अँपवर दुसरे ऑनलाईन कविसंमेलन नुकतेच संपन्न झाले. यापूर्वी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पहिल्या ऑनलाईन कविसंमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील साहित्यिकांनी आपल्या रचना सादर करून उपस्थितांचे मन जिंकून घेतले. तत्पूर्वी महिल्यांच्या जीवनात शिक्षणाची ज्योत पेटविलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यानंतर कविसंमेलन प्रारंभ करण्यात आले. त्यात पुणे येथील प्रीती दबडे यांनी आजची नारी कविता सादर केली. वाशीम येथील गोपाल वसंतराव खाडे यांनी बासणात गुंडाळा तुमची महासत्ता ही आजच्या परिस्थितीवर भाष्य करणारी कविता सादर केली तर नाशिक येथील कवयित्री आरती डिंगोरे यांनी वैधव्य कवितेतून महिलेला जगण्याची उमेद दिली. जालना येथील डॉ. प्रा. बी. जी. श्रीरामे यांनी कशी गं आई ही कविता सादर करून रसिकांचे मन जिंकून घेतले. यासोबतच नांदेडचे कवी प्रल्हाद घोरबांड, गडचिरोलीच्या सौ. संगीता ठलाल, धर्माबादचे कवी धोंडिबा गायकवाड, बिलोलीच्या सौ. सारिका मद्दलवार, बोरिवली मुंबईच्या शैला जुन्नरकर आदी साहित्यिकांनी आपल्या सुंदर रचना सादर केल्या. आजच्या या ऑनलाईन कविसंमेलनासाठी वसमत येथील म. गांधी माध्यमिक विद्यालयातील मराठीच्या शिक्षिका सौ. संगीता देशमुख ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी सर्वच नवोदित आणि उदयोन्मुख कवी-कवयित्रीचे तोंड भरून कौतुक केले.ऑनलाईन प्रस्तुत कविसंमेलनाची तांत्रिक बाजू तंत्रस्नेही शिक्षक उदयकुमार शिल्लारे यांनी सांभाळली होती. सदरील कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन नासा येवतीकर यांनी केले.

# स्त्री कडून स्त्रीचा सन्मान व आदर करायला पाहिजे




लातूर /प्रतिनिधी- शिस्त, वेळेचे नियोजन सातत्य ,आत्मविश्वास, दूरदृष्टी, इच्छाशक्ती,सृजनशीलता,वर्तमान काळाचा विचार यासूत्राचा अवलंब प्रत्येकाच्या जीवनामध्ये तंतोतंत पालन केल्यानंतर यश हमखास मिळते असे प्रतिपादन रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस लातूरचे संचालिका सौ मीनल शिवराज मोटेगावकर यांनी सांगितले. श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी ,आणि लातूर कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमानाने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सौ मीनल शिवराज मोटेगावकर यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे, संचालक नंदकिशोर बावगे, सौ माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला ,प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्या डॉ. श्यामलीला जेवळे, प्रभारी प्राचार्य शुभम वैरागकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सौ मीनल शिवराज मोटेगावकर पुढे बोलत असताना मुलींनी शिक्षण घेत असताना आपल्या आई-वडिलांची शरमेने मान कधीच खाली होऊ देऊ नका प्रामाणिकपणे अभ्यास आणि अभ्यास करा असे सखोल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक पुरुषाच्या यशामागे आपल्या धर्मपत्नीच्या सिंहाचा वाटा असतो असे प्रतिपादन सचिव वेताळेश्वर बावगे यांनी केले. तसेच नंदकिशोर बावगे मनोगत व्यक्त करतानाप्रत्येक मुलीच्या मनगटामध्ये बळ असायला पाहिजे कसलाही समोर पाषाण आला तरी फोडून काढू अशी धाडस मुलीमध्ये असायला पाहिजे असे असे उद्गार काढले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. अक्षता लासुरे तर आभार प्रदर्शन नंदकिशोर बागवे यांनी केले या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद मुली मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



लातूर :- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई मार्फत घेतल्या जाणाऱ्या मॉडल मेकिंग स्पर्धेमध्ये दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर च्या डी.फार्मसी मधील विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना,कल्पकतेला,सर्जन शीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्टेजवरील भीती दूर करण्याकरिता महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळातर्फे अशा स्पर्धांचे नेहमीच आयोजन केले जाते. याच स्पर्धेचा एक भाग म्हणून श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी,छत्रपती संभाजी नगर व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या स्पर्धे मध्ये दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या राठोड अजय दिलीप व पोतदार पायल संतोष या विद्यार्थ्यांनी मॉडल मेकिंग स्पर्धेमध्ये फार्मा ए.टी.एम.( एनी टाइम मेडिसिन ) या विषयावर यशस्वीरित्या सादरीकरण करून राज्य स्तरावर डी.फार्म विभागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धे करिता संघ व्यवस्थापक म्हणून प्रा.दिपाली स्वामी यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत राज्यातील विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.सहभागी संघांचे मॉडेल मेकिंग स्पर्धेतील विषयांचे निरीक्षण करून विजेता निवड करण्याकरिता चार सदस्यांची समिती नेमली होती त्यात सायली चॅरिटेबल ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी; छत्रपती संभाजी नगर चे प्राचार्य डॉ.अभिजीत पोहेकर,वाय.एस. खेडकर कॉलेज ऑफ फार्मसी,छत्रपती संभाजी नगरचे प्रा. प्रकाश मस्के,यश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी छत्रपती संभाजीनगर चे प्रा.अभय जोशी आणि गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी छत्रपती संभाजी नगरच्या प्रा.शितल चव्हाण यांनी सहभागी संघांपैकी विजेत्यांची निवड करून त्यांना प्रमाणपत्र मानचिन्ह व प्रथम पुरस्कार रोख रुपये ३००० देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनि यशस्वी प्रकल्प सादरीकरण करून त्यांच्या सोबत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व महाविद्यालयीन प्राद्यापक वृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

Caring Since 1980

कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित

४१ वर्षापासून

यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर
(दृष्टी-एकमेव ध्येय)

डॉ. विश्वास य. सताळकर — नेत्ररोग तज्ञ
डॉ. यशोधन वि. सताळकर — बाल नेत्ररोग तज्ञ
डॉ. अनुजा य. सताळकर — नेत्ररोग तज्ञ

यशवंत नेत्र रूग्णालय व फॅको सेंटर
नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215

उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोरे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव

# कृष्णा- मराठवाडा सिंचन योजना पाणी वचनपूर्ती सोहळ्याचे आयोजन

## हजारो शेतकरी होणार ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त कृष्णा - मराठवाडा सिंचन योजनेच्या हक्काच्या पाण्याचा वचनपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त मिरगव्हाण - बंगाळवाडी या स्थळी या मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांना दाखवण्यासाठी दि.१० मार्च रोजी दाखविण्यासाठी नेण्यात येणार आहे.



महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त कृष्णा - मराठवाडा सिंचन योजनेतून हक्काचे पाणी परंडा, भूम व वाशी या भागात आणण्यासाठी मंत्री प्रा डॉ सावंत यांनी निधी खेचून आणला आहे. त्यांनी मंत्री झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये हे पाणी २०२४ पर्यंत आणणारच असा ठाम निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळे निधी खेचून आणण्यासह टेंडर प्रक्रिया व टेंडर सुरू झाल्यानंतर आवश्यक असलेली अर्धवट कामे युद्धपातळीवर करून घेण्यासाठी सातत्याने यशस्वी पाठपुरावा केला. त्यामुळे ते पाणी येण्याचे सर्व मार्ग मोकळे झाले असून मिरगव्हाण - बंगाळवाडी या ठिकाणास या मतदारसंघातील जवळपास २० हजार शेतकऱ्यांना पाहणी करण्यासाठी नेण्यात येणार आहे. या पाण्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये प्रचंड मोठी आर्थिक क्रांती होणार असून या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार शेतकऱ्यांना होता यावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या कार्यक्रमास जास्तीत जास्त शेतकरी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा भैरवनाथ शुगर वर्क्सचे कार्यकारी संचालक धनंजय सावंत, शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे, प्रा गौतम लटके आदींसह इतर पदाधिकाऱ्यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# शिक्षणातून संस्कारांची पेरणी व्हावी: कदम




उदगीर : ( प्रतिनिधी ) विद्यार्थी जीवनात पुस्तकी ज्ञानाबरोबर संस्कार महत्व-पूर्ण असतात. जाती-धर्माच्या भिंती तोडून माणुसकीची इमारत उभारण्यासाठी बाह्य अलंकारापेक्षा संस्कार महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यामुळे शिक्षणातून संस्कारांची पेरणी व्हावी, असे मत सुप्रसिद्ध कवी राजेसाहेब कदम यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन उदयोत्सव - २०२४ च्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड. एस. टी. पाटील व डॉ. आर. एन. लखोटिया, सदस्य बसवराज पाटील मलकापूरकर, शिवराज वल्लापुरे, प्रशांत पेन्स-लवार, ललिता पाटील, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्रा-चार्य प्रा. एस. जी. कोडचे, पर्यवेक्षक प्रा. जे. आर. कांदे, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रभारी प्रा. डॉ. एस. एन. लांडगे, प्रा. डॉ. मल्लेश झुंगास्वामी, प्रा. डॉ. अर्चना मोरे, श्रीगण रेड्डी, परमेश्र्वर वाकुडे, विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार स्वामी यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना राजेस-ाहेब कदम म्हणाले, कवीला मनाची भाषा कळते. कविता प्रश्न निर्माण करते त्याचबरोबर कविता ठरवून लिहिता येत नाही. सामाजिक विसंगतीतून कविता जन्म घेते. प्रत्येक विद्यार्थ्याने कवितेचा आशय समजून घ्यावा व त्यातून नवनिर्मिती कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावा, असे मत मांडले. त्यांनी आपल्या विविध कवितांच्या सादरीकरणातून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

अध्यक्षीय समारोप करताना मल्लिकार्जुन मानकरी म्हणाले, संस्काराशिवाय माणसाची प्रगती, समृद्धी व विकास होऊ शकत नाही. वार्षिक स्नेहसंमेलनातून कला गुण प्रदर्शित करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असते. त्यामुळे हा संस्कार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. मस्के यांनी तर पाहुण्यांचा परिचय स्नेहा नामवाड या विद्यार्थिनीने करून दिला. स्वागतगीत आरती वाकोडे या विद्यार्थिनीने गायले. सूत्रसंचालन शुभम मोतीपवळे व वैष्णवी आचार्य यांनी तर आभार हेमलता गायकवाड हिने मानले.

# आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते कलकोटीत ८ कोटी दोन लक्ष रुपयांच्या कामांचे भूमिपूजन



चाकूर / प्रतिनिधी - विविध विकास योजने अंतर्गत चाकूर तालुक्यातील कलकोटी येथे ८ कोटी दोन लक्ष रुपयांच्या डांबरीकरण, सिमेंट रस्ता व पुलाच्या कामांचे भूमिपूजन चाकूर अहमदपूर तालुक्याचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यामध्ये ५ कोटी रुपयाचे कलकोटी ते अजनसोंडा (बु) रोडचे सिमेंटीकरण व डांबरीकरण, २ कोटी ७२ लाख रुपयाच्या कलकोटी ते अजनसोंडा (बु) रस्त्यावरील पुलाचे बांधकाम , मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत २० लाख रु, सामाजिक न्याय विभाग अंतर्गत दहा लाख रुपयांच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन अशा एकूण ८ कोटी दोन लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य पद्माकरराव पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून नगर पंचायतचे गटनेते करीमसाहेब गुळवे, राष्ट्रवादी काँग्रेस जेष्ठ नेते बालाजी सूर्यवंशी, माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे, नगर पंचायतचे बांधकाम सभापती मिलींद महालिंगे, माजी पंचायत समिती सदस्य शिवाजीराव माने, सरपंच परमेश्र्वर कांबळे,नगरसेवक मुज्जमील सय्यद,माजी नगरसेवक इलियास सय्यद , उपअभियंता निकम, सेवादलाचे तालुकाध्यक्ष शिवदर्शन स्वामी, रामभाऊ कसबे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण तिकटे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता शरद निकम, कंत्राटदार बिक्कड, राष्ट्रवादीचे चाकूर शहराध्यक्ष शिवशंकर हाळे, सरपंच अंतेश्र्वर माने, सरपंच देवीदास माने, सरपंच हणमंत नरवटे, सरपंच वैजनाथ पाटील, दासराव पाटील, अनिल वाडकर, माजी चेअरमन सिद्धाजी माने, ,सुरज पटणे, सामाजिक न्याय विभाग जिल्हा कार्याध्यक्ष विष्णु तिकटे, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष विश्र्वनाथ येडके, प्रा. विश्र्वनाथ घाटकार , डी. जी. भुरकापल्ले ,नवनाथ आवाळे, मारुती माडगे, रामकिसन चिंचोले,धारबा पाटील, शशिकांत भोसले,बिलाल पठाण, संगमेश्र्वर कसबे, अनिसभाई पठाण, शैलेश लवटे, आशताप पठाण, पवन बिरकळे, अजीत शेख,समाधान जाधव,सुरज घुमे, शकील गुळवे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्ष आदित्य लवटे,सचिन तोरे,चंद्रमणी सिरसाठ, नारायण काचे, बापूसाहेब पाटील, हणमंत भोसले,अमोल जम्पनगिरे,ओमेश कसबे, रहीम शेख, धारबा पाटील, बालाजी पाटील तळेगावकर, पंडित पवार, संजय मुगळे, विकास सावरगावे,योगीराज स्वामी, पवन सांगवे, विजयकुमार बिराजदार, दशरथ वागलगावेआदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की मतदारसंघात विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून विकासकामे करण्यात आली. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून अनेक लोकोपयोगी कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मी आमदारकी खऱ्या अर्थाने कामाला लावली आहे. येणाऱ्या काळातही या भागातील मुलभूत गरजा पुर्ण करून मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून मतदार संघाच्या विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही आ. बाबासाहेब पाटील यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणपत नितळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन बिलाल पठाण यांनी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास आ. पाटील यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संयोजन समितीच्या वतीने आ. पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणपत नितळे, सूर्यकांत मिसे,सोपान नितळे, नामदेव नितळे, प्रभाकर जहागीरदार, मारोती हेमनर, चंद्रकांत नेवाळे, व्यंकटराव हाके, बाबूराव मदनुरे, नीलकांत मुद्रासे, चंद्रकांत नेवाळे, राहुल गायकवाड, श्रावण कांबळे, राजकुमार शेवाळे, लखन नेवाळे, लक्ष्मण कांबळे, मन्मथ वाडकर, अण्णा जहागीरदार, बालाजी हेमनर, सतिष जहागीरदार, त्र्यंबक पाटील, शंकर मोकाशे, विष्णू खेरडे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी कलकोटी व परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळकोटच्या लोहार देवस्थानसाठी निधि उपलब्ध करून देण्याची मागणी

जळकोट : प्रतिनिधी- येथील मलोहार म देवस्थ-ान बांधकाम आश्र्वासनाच्या आशा उपेक्षितच राहिल्या असून निवडणूकीपूर्वी मंत्री संजय बनसोडे यांनी देवस्थानी भेट देऊन मंदीराचा कायापालट करण्याचे आश्र्वासन दिले होते. त्याची पूर्तता करण्याची मागणी भाविकांनी केली आहे.

जळकोट शहरा-तील भाविकांचे श्रद्धास्थान असणारे लोहार देवस्थान येथे हाजारो भक्त मोहरम उत्सव पहाण्यासाठी व साजरा करण्यासाठी या ठिकाणी येतात. त्यात हिंदू - मुस्लिम समाजातील सर्वजन एकत्रित येऊन हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात परंतू या लोहार देवस्थ-ानची आज दुर्दशः झाली आहे. देवस्थानाला भगदाड पडून पूर्णतः पडझाड झाली आहे निधी अभावी बांधकाम रखडले आहे. देवस्थानाच्या इमारतीला खुप मोठे भगदाड पडले आहे , पावसाळ्यात धो - धो पावसात देवस्थानाच्या सिलिंग मधुन पाणी टपाटप सवाऱ्याच्या अंगावर पडत आहे. तसेच भक्ताना भर पा-वसातच उभे रहावे लागत आहे. चारही बाजूंनी बेसमेंट जमीनीत उतरली आहे. सिलॅपची सळई उघडी पडली असून भिंतीच्या मध्यभागी मोठे भगदाड पडले आहे. सापांचा वावर या ठिकाणी असून जीव मुठीत धरून सवाऱ्याची पुजा अर्चना करावी लागते आहे.

लोहार देवस्थान स्थळी विधानसभा निवडणूक २०१९ च्या वेळी उदगीर - जळकोट विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे हे देवस्थान स्थळी भेट देण्यास आले होते. त्यावेळी त्यांनी पहाणी केली आणि देवस्थानच्या भक्तनिवास बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देवस्थ-ानाचा कायापालट करणार असे आश्र्वासन दिले होते. अद्याप ३ ते ४ वर्षे पूर्ण होत आले तरी निधी काही मिळाला नसल्याचे तुकाराम कळसे यांनी सांगितले. मंत्री संजय बनसोडे यांनी दिलेले आश्र्वासन पूर्तता करत निधि उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी लोहार देवस्थानाचे अध्यक्ष व्यवस्थापक तुकाराम धोंडिबा कळसे यांच्यसह असंख्य भक्तांनी केली आहे .

**CHANGE IN NAME**

I have change name from GANESH VISHWANANTH BIDVE TO GANESH VISHWANATH BIDAVE Hence for this declaration in future. **Old Name:** GANESH VISHWANANTH BIDVE
**NEW NAME:** GANESH VISHWANATH BIDAVE
In future the same name will be used by my spouse and children
**Address:** Omsai residency rudreshwar chouck, L.I.C. Colony, Latur-413512 Mahrashtra Mobile No.-9405609074

**जाहिरनामा**

**मा.एन.जे.चव्हाण,३रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८०/२०२४**
**निशाणी क्र.०७**
**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्याअर्थी नामे SUMIT S/O TANAJI PANCHAL हे दि.१२/०५/२०१८ रोजी UDGIR TQ.UDGIR DIST.LATUR येथे मयत झाले आहेत.व अर्जदार
1)TANAJI S/O RAGHUNATHRAO PANCHAL,AGE GE--63,OCCU--PENSIONER
2) SMT. SUBHADA W/ MANOJKUMAR REGODKAR AGE-33,OCCU-H.H.
R/O SHIVNAGAR BIDAR TQ.BIDAR DIST.BIDAR
3) SOU. SUMEDHA W/O PRASHANT PANCHAL AGE-30,-OCCU-H.H.
1 & 3 R/O HRINAGAR ,COLONY ,UDGIR DIST.LATUR
१८ यांनी खालिल नमुद हे मयताचे वारसदार असुन
1)TANAJI S/O RAGHUNATHRAO PANCHAL,AGE AGE--63,--FATHER
2) SMT. SUBHADA W/O MANOJKUMAR REGODKAR AGE-33,-- SISTER
3) SOU. SUMEDHA W/O PRASHANT PANCHAL AGE-30--SISTER
अर्जदार याने SUMIT S/O TANAJI PANCHAL या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.
त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू SUMIT S/O TANAJI PANCHAL यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांका ०४/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख:-१९/०४/२०२४/

**(ए.आर. गायकवाड)**
**कनिष्ठ लिपीक**
**३ रे सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर,उदगीर**

**आदेशावरुन**
**(एस. एम.शेटे)**
**साह्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर,उदगीर**

पान १ वरून...

### राहुल गांधींविरोधातील...

गांधी यांच्याविरोधात पुणे न्यायालयात मानहानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे.

सात्यकी सावरकर यांनी संबंधित सर्व पुरावे व साक्षीदार न्यायालयात सादर केले होते. संबंधित पुरावे व साक्ष गृहीत धरून दि. १९ फेब्रुवारी रोजी या प्रकरणात प्राथमिक सत्यता निदर्शनास आल्यामुळे व आरोपी न्यायालयाच्या कक्षेबाहेर वास्तव्यास असल्यामुळे या प्रकरणात न्यायालयाने संबंधित पोलिस स्टेशनला फौजदारी प्रक्रिया संहिता २०२ अन्वये सखोल तपास करण्याचे आदेश दिले होते. फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार आर-ोपी न्यायालयीन स्थळ सीमेबाहेर वास्तव्यास असल्यामुळे विश्रामबाग पोलिसांना तपासणी अहवाल २३ फेब्रुवारी अथवा तत्पूर्वी सादर करण्याबाबत आदेश दिले होते. पण, हा अहवाल दिनांक ५ मार्चपर्यंत सादर न केल्यामुळे न्यायालयाने संबंधित पोलिसांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ एप्रिल रोजी होणार आहे.

### बारामतीचा ...

भोरच्या सभेच्या आधी अनंतराव थोपटे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि हा ४० वर्षाचा संघर्ष मिटवला. त्यामुळे थोपटे यांचे वजन आता सुप्रिया सुळे यांच्या पारड्यात पडणार हे निश्र्चित झाले असून त्यामुळे अजित पवारांची मात्र अडचण वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

### सौरऊर्जा...

शेतकऱ्यांना माफक दरामध्ये १२ तास कृषी पंपाला विज पुरवठा करणारी योजना असून, या योजनेतून शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसभर विज पुरवठा होणार आहे. त्यामूळे याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यात विजनिर्मिती करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा. लि. या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दिनेश दिलीपराव माने व डायरेक्टर श्री. रितेश दिलीपराव माने यांना सुपूर्द करण्यात आले आहे. या प्रकल्पाचे काम मिळाल्याबद्दल श्री. दिनेश व श्री. रितेश यांनी श्री देवेंद्र फडणवीस साहेबांचे आभार मानले आहेत. त्यासोबतच नव्या क्षेत्रात उमेदीने पदार्पन करणाऱ्या श्री सत्यसाई बाबा इन्फ्रा वेंचर्स प्रा. लि. या कंपनीस श्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### लातूरच्या...

पाटील यांनी काढली. नूतन जिल्हाध्यक्ष संजय शेटे उत्तम कार्य करतील असा आपल्याला विश्वास असल्याचे त्यांनी बोलून दाखविले .

संजय शेटे यांनी यावेळी बोलताना समाजाची शक्ती पाठीशी असल्याशिवाय कोणीही मोठा होऊ शकत नाही,असे सांगितले. उदय चौंडे यांनी अत्यंत मोठ्या मनाने राष्ट्रवादी भवनसाठी जागा उपलब्ध करून दिल्यामुळेच कार्यालयाचे उदघाटन होऊ शकले असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमाकांत कोरे यांनी तर आभार प्रदर्शन उदय चौंडे यांनी केले. या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाज, कपिलधार सेवा संघ , लिंगायत सेवा संघ यांसह विविध संघटनांच्या वतीने आ. जयंत पाटील यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी राजाभाऊ हालकुडे , शिवलिंगप्पा जवळे, बंडाप्पा जवळे, राजकुमार कत्ते , डॉ.अरविंद भातांब्रे, बालाजी पिंपळे, अक्षयकुमार चौंडे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# किंमत नियंत्रणासाठी सरकार कांद्याचा बफर स्टॉक करणार

नवी दिल्ली : कांद्यासंदर्भात सरकारने नवीन योजना आखली आहे. यावर्षी बफर स्टॉकसाठी ५ लाख टन कांदा खरेदी करण्याचा सरकारचा विचार आहे. कांद्याच्या वाढत्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे यंदा कांद्याच्या वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सरकारकडून नॅशनल कोऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि नॅशनल ॲग्रिकल्चर कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांसारख्या एजन्सी सरकारच्या वतीने कांद्याची खरेदी करतील. दरम्यान, अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्रालयाने गेल्या वर्षी ५ लाख टनांचा बफर स्टॉक तयार केला होता. त्यापैकी १ लाख टन अद्याप उपलब्ध आहे.

बफर स्टॉकमधून सवलतीच्या दरात कांद्याची विक्री करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे किमती नियंत्रणात राहण्यास मदत झाल्याचे सूत्रांनी सांगितले. या महिन्याच्या अखेरीस कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याबाबत सरकार निर्णय घेणार आहे. ही बंदी ३१ मार्चपर्यंत आहे. २०२३-२४ मध्ये कांद्याच्या उत्पादनात घट होण्याच्या अंदाजानुसार बफर स्टॉक तयार करण्याची सरकारची योजना आहे.

**२५४.७३ लाख टन कांदा अपेक्षित**

कृषी मंत्रालयाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनानुसार, २०२३-२४ मध्ये जवळपास २५४.७३ लाख टन कांद्याचे उत्पादन अपेक्षित आहे, तर गेल्या वर्षी ते सुमारे ३०२.०८ लाख टन होते. महाराष्ट्रात ३४.३१ लाख टन, कर्नाटकात ९.९५ लाख टन, आंध्र प्रदेशात ३.५४ लाख टन आणि राजस्थानमध्ये ३.१२ लाख टन उत्पादन कमी झाल्यामुळे एकूण उत्पादनात ही घट होण्याची शक्यता आहे. आकडेवारीनुसार, २०२१-२२ या आर्थिक वर्षात कांद्याचे उत्पादन ३१६.८७ लाख टन होते.

**विदेशात कांदा निर्यातीला मान्यता**

सरकारने नुकतीच काही देशांमध्ये कांदा निर्यातीला मान्यता दिली. नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेडमार्फत भूतान, बहरीन आणि मॉरिशसला ४,७५० टन कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्यात आली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने एका अधिसूचनेत म्हटले आहे की, भूतानला ५५० टन, बहरीनला ३,००० टन आणि मॉरिशसला १,२०० टन कांदा निर्यात करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**सुर्य कल्याण मुंबई रात्र**
स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**
स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९०<br>४८०<br>२२८ | ६ | २४०<br>२६८<br>३३० | ० | १४५<br>२३५<br>५५० |
| | ९२-२१ | | ३६-६७ | | ८०-०४ |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९<br>२३८<br>६७० | १ | १४६<br>४७०<br>१०० | ८ | १२५<br>२६०<br>४४० |
| | ९३-३२ | | ०१-१४ | | ७८-८६ |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**
कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130<br>248<br>220 | ७-४ | 124<br>467<br>700 | जोड | 40-67-91-82-75 |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127<br>280<br>460 | ४-० | 158<br>680<br>455 | जोड | 06-24-39-57-48 |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९<br>२९८<br>३७७ | ०-७ | १४५<br>२३५<br>५५० | जोड | 72-30-18-45-09 |

दिवाळी बंपर चालू आहे
99 75 47 98 26



यशवंत

रविवार दि. १० मार्च २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## हर हर महादेव च्या जयघोषाने दुमदुमली

हंडरगुळी-(प्रतिनिधी ) महाशिवरात्री निमित्त येथील श्री.महादेव मंदीरात आसपास असलेल्या गावातील हजारो भाविक- भक्तांचा मेळा दर्शनासाठी जमला होता.व यावेळी हर हर महादेव अशा जयघोषाने हंडरगुळीनगरी दुमदुमली होती.व प्रभू श्रीरामानी स्व- हाताने स्थापन केलेल्या पिंडीची सुरेख अशी सजावट करण्यात आली व यावेळी हजारो भाविकांनी विशेष करुन महिला भक्तांनी शंभो महादेव मंदीरात दर्शनासाठी पहाटे पासुनच गर्दी केली होती.वनवासात असताना येथील तिरु नदी पात्रातील पाण्याने स्नान करुन श्रीरामाने नदीपात्रातील वाळूच्या साह्याने महादेवाची पिंड तयार करुन दर्शन घेतले होते. अशी एक अख्याईका आहे.तसेच हा महादेव नवसाला पावतो म्हणुन आसपास असलेल्या गावातील शेकडो भाविक दररोज दर्शनासाठी येतात.आणि दि. ८/३/२४ रोजी महाशिवरात्री निमित्त हंडरगुळीच्या महादेव मंदीरात हजारो भक्तांचा मेळा जमला होता.आणि या सर्व भक्तांच्या मुखातून हरहर महादेव असा जयघोष होत होता.



# खेळाडूंनी खाशाबा जाधव यांचे स्वप्न पूर्ण करावे : संजय बनसोडे

उदगीर : जागतिक ऑलम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याचे स्व. खाशाबा जाधव यांचे स्वप्न होते, ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यातील खेळाडूंनी प्रयत्न करावेत असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर आयोजित स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे उदघाटन ना. बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, बसवराज पाटील नागराळकर, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर - घुगे, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, व्यंकटराव बेद्रे, रमेश अंबरखाने, मल्लिकार्जुन मानकरी, गुलाब पटवारी, तीन वेळा महाराष्ट्र केसरी किताब पटकावणारे उपविभागीय पोलीस विजय चौधरी, बापू लोखंडे, नामदेव कदम, प्रसिध्द मल्ल असलम काही, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, बालाजी भोसले पाटील, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे , संग्राम हासुळे पाटील, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी गोवा येथे मागच्या काळात पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राला २२८ पदके मिळाली असल्याची माहिती देऊन राज्याचा क्रीडा मंत्री म्हणून ही पदके स्वीकारताना आपल्याला विशेष अभिमान असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. कुस्ती हा खेळ मराठवाड्यात लोकप्रिय असून लातूर जिल्ह्याला देखील कुस्तीचा समृद्ध असा वारसा आहे. तो वारसा पुढे नेण्यासाठी जिल्ह्यातील कुस्तीपटूंना प्रेरणा म्हणून यासाठी उदगीर येथे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले असल्याचेही यावेळी ना. बनसोडे यांनी सांगितले.

उदगीरसह ग्रामीण भागातील खेळाडूंना खेळण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शहरातील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर १४ कोटी रुपये खर्च करून भव्य दिव्य क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त तोंडार येथील कारखान्याजवळ गायरान जमिनीवर जवळपास ८२ कोटी रुपये खर्च करून भव्यदिव्य असे अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्याचा माझा मानस आहे. या कामाचे लवकरच भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दिली.

अवघ्या चार दिवसात भव्य दिव्य अशा राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल आयोजन समितीच्या पदाधिकारी यांचे ना. बनसोडे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्याचे क्रीडा उपसंचालक संजय सबनीस यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेल्या अभिनेत्री शेफाली जरीवाला यांनी काटा लगा, झिंगाट व अन्य गाण्यावर नृत्याविष्कार सादर केला.



यावेळी लेझर शो च्या माध्यमातून कुस्तीचा इतिहास व खाशाबा जाधव यांच्या कार्याची माहीती दाखविण्यात आली. त्यानंतर व फायर शो करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील इनडोअर स्टेडियमचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या शुभहस्ते आज उद्घाटन

उदगीर / प्रतिनिधी- श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर येथील भव्य आणि सुसज्ज इनडोअर स्टेडियमचे उद्घाटन राज्याचे क्रीडामंत्री तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री संजय बनसोडे यांच्या शुभहस्ते रविवारी दि.१०/०३/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर हे भूषविणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री.आ. बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार मा.श्री.विक्रम काळे,माजी नगराध्यक्ष श्री राजेश्वर निटुरे, अर्चनाताई पाटील चाकूरकर, उपजिल्हाधिकारी मा.श्री.सुशांत शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव मा.श्री.उमेश पाटील देवणीकर,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडासंचालक डॉ मनोज रेड्डी,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती मा.श्री.शिवाजीराव हुडे, वीरशैव समाजाचे अध्यक्ष मा.श्री. चंद्रकांत अण्णा वैजापुरे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर इनडोअर स्टेडियमचे उद्घाटन होणार असून सभेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले आहे.महाविद्यालयाच्या क्रीडांगणावरील हे इनडोअर स्टेडियम अतिशय सुसज्ज असे असून एकाच वेळेस अनेक खेळ या स्टेडियमवर खेळता येणार आहेत.या स्टेडियममुळे विद्यार्थी आणि उदगीर शहरातील अनेक खेळाडूंप्रेमींना खेळ खेळण्याची संधी महाविद्यालयानी मिळवून दिली आहे.या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक आणि उदगीर शहरातील खेळाडूंनी उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष श्री.शिवकुमार हसरगुंडे, उपाध्यक्ष संगमेश्र्वर जिरगे, सहसचिव श्री प्रभुराज कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ एन.जी.येमेकर, उपप्राचार्य डॉ आप्पाराव काळगापुरे, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत धनुरे,प्रा. डॉ.एस.के.एकंबेकर, स्टॉफ सेक्रेटरी प्रा.वसंत पवार आदींनी केली आहे.

## शारदाच्या विद्यार्थ्यांची राज्य पुरस्कारासाठी निवड

लातूर / प्रतिनिधी- राज्य भारत स्काऊट आणि गाईड संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या शिबिरातून येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या चार विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

लातूर येथे राज्य पुरस्कार चाचणी शिबिर घेण्यात आले. यात चैताली दयानंद कपाळे, आयूषी किरण पांचाळ, श्रेया गोपाळ मदने, शांभवी संतोष कुलकर्णी या चार विद्यार्थ्यांची राज्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सदर विद्यार्थ्यांना या पुरस्काराने राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेस बसण्याची संधी उपलब्ध झाली आहे. राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेची पूर्व तयारी केल्यानंतर त्यांना सदर पुरस्कारप्राप्त होऊ शकतो.याबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य, दत्ता घारगे, उपप्राचार्य विलास गायकवाड, उपप्राचार्या शीला शेळके, मुख्य समन्वयिका वैशाली गिरवलकर यांनी कौतुक केले आहे.

# श्रीराम मंदिरात मातृ शक्तीचा सन्मान



उदगीर / प्रतिनिधी- जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आज पतंजली योग समितीच्या विद्यमाने श्रीराम मंदिर जळकोट रोड उदगीर येथे पतंजली योग समितीतील महिला पदाधिकारी महिला साधक, व उपस्थित सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पतंजली योग समितीचे अध्यक्ष सुरेंद्र अकनगिरे यांनी कार्यक्रमाचे संचलन केले.

याप्रसंगी प्रा. नरेंद्र शिंदे, प्रा. श्रीराम चामले, नरेंद्र यंदे धनराज बिरादार ,उमाकांत अंबेसंगे यांनी तसेच महादेव खताळ सर यांनी मातृशक्ती बद्दल गौरवोद्गार काढले. त्याशिवाय सर्व स्त्रियांचा यथोचित असा सन्मान करण्यात आला त्या सन्मानाला उत्तर देत असताना सौ.मीनाक्षीताई स्वामी, सौ.मधुमती शिंदे,सुशिलाबाई पाटील सौ. चौधरी बाई,सौ. दंडवते ताई सौ.मध्वरे बाई,व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती शंकुतला बाई आदेप्पा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ,पंडित ताई,सौ.लक्ष्मीबाई अंबेसंगे,व अनेक महिला उपस्थित होते. त्याशिवाय श्रीकांत स्वामी,राम राजे ,अॅड ज्ञानोबा बेदडे , इंद्राळे , प्राचार्य वीरभद्र काप्पिकरे,ईत्यादी महिला साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी प्रा. श्रीकांत स्वामी यांनी आभार मानले. शांती पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.


सत्यं शिवं सुंदरम्

भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे,

**श्री हावगीस्वामी महाविद्यालय**

उदगीर जि.लातूर

**इनडोअर स्टेडियम उद्घाटन समारंभ**

: अध्यक्ष :
मा.अॅड्.गुणवंतराव पाटील हैबतपूरकर
(अध्यक्ष, भा.लि.ए.सोसायटी, उदगीर)

: उद्घाटक :
मा.ना.संजयजी बनसोडे
(क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री, म.रा.मंत्रालय, मुंबई तथा पालकमंत्री, परभणी)

: प्रमुख पाहुणे :
मा.बाबासाहेब पाटील (आमदार, अहमदपूर विधानसभा)
मा.विक्रम काळे (आमदार, शिक्षक मतदारसंघ, छ.संभाजीनगर)
मा.राजेश्वरजी निटुरे (माजी नगराध्यक्ष, उदगीर)
मा.सुशांत शिंदे (उपजिल्हाधिकारी, उदगीर)
मा.डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर

: प्रमुख उपस्थिती :
मा.उमेश माणिकराव पाटील देवणीकर (सचिव, भा.लि.ए.सोसायटी, उदगीर)
मा.डॉ.मनोज रेड्डी (क्रीडा संचालक, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड)
मा.शिवाजी हुडे (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, उदगीर)
मा.चंद्रकांतअण्णा वैजापुरे (अध्यक्ष, वीरशैव समाज, उदगीर)

या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी आपण उपस्थित रहावे.

: विनीत :
मा.शिवकुमार हसरगुंडे (उपाध्यक्ष, भा.लि.ए.सोसायटी)
मा.संगमेश्वर जिरगे (उपाध्यक्ष, भा.लि.ए.सोसायटी)
मा.प्रभुराज कप्पीकेरे (सहसचिव, भा.लि.ए.सोसायटी)
मा.शंकरप्पा हरकरे (कोषाध्यक्ष, भा.लि.ए.सोसायटी)

सर्व सन्माननीय सदस्य, भारत लिबरल एज्युकेशन सोसायटी, उदगीर

डॉ.ए.ए.काळगापुरे (उपप्राचार्य)
डॉ.एन.जी.एमेकर (प्र.प्राचार्य)
श्री.एस.बी.धनुरे (कार्यालय अधीक्षक)
डॉ.एस.के.एकंबेकर (क्रीडा विभाग)
प्रा.व्ही.आय.पवार (स्टाफ सेक्रेटरी)

प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी

दिनांक : १०/०३/२०२४ वार : रविवार वेळ : दुपारी ०१:०० वा.
स्थळ : श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर


## श्री हावगीस्वामी महाविद्यालयात सोमवारी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

उदगीर /प्रतिनिधी- श्री हावगीस्वामी महाविद्यालयात दि.११/०३/२०२४ रोज सोमवारी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर हे भूषविणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे अधिष्ठाता सदस्य डॉ डी.एन.मोरे,उदगीरचे तहसीलदार मा.श्री राम बोरगांवकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी संस्थेचे सचिव मा.श्री.उमेश पाटील देवणीकर, राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर येथील उपप्राचार्य मा.डॉ.सदाशिव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाला शैक्षणिक वर्ष उन्हाळी २०२२,व २०२३ या कालावधीतील पदवी (बी.ए.,बी. एस्सी,बी.कॉम.तृतीय,वर्ष) पदव्युत्तर एम.ए.द्वितीय मराठी,हिंदी, भूगोल, वाणिज्य) वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन प्र.प्राचार्य डॉ.एन.जी.येमेकर, उपप्राचार्य डॉ.आप्पाराव काळगापुरे, परीक्षा विभागप्रमुख डॉ कृष्णा अनवले,परीक्षा विभागातील सदस्य,डॉ. दिलिप सूर्यवंशी,डॉ.सौ.उषा धसवाडीकर डॉ सुशीलप्रकाश चिमोरे आदींनी केले आहे.


**संजय घोडावत आय.आय.टी अॅण्ड मेडिकल अकॅडमी, उदगीर**

पाहिजेत

उदगीर येथील **Sanjay Ghodawat IIT & Medical Academy** या शिक्षण संस्थेमध्ये खालील पदे भरणे आहे.

१. मार्केटिंग एक्झिक्युटीव्ह — ५ पुरूष
२. टेलिकॉलर — २ महिला
३. मार्केटिंग काऊन्सेलर — ३ पुरूष/महिला
४. रिसेप्शनिस्ट — १ महिला

पात्रता - पदवीधर/ पदव्युत्तर

५. ऑफिस बॉय — २पुरूष

मुलाखत दिनांक:— ११,१२ व १३ मार्च २०२४

वेळ सकाळी. १० ते ५ सायकांळी

पता:—कोटा मेन्टॉर अकॅडमी, मेथॉडिस्ट शाळेच्या समोर, बिदर रोड, उदगीर —४१३५१७

संपर्क.७०५७७८४७४७/९८८१५५९५५८

Niture AGRO TOURISM
निटुरे कृषी पर्यटन, उदगीर
श्री.राजराजेश्वरी मंदीरच्या समोर..

एक दिवसीय ट्रिप साठी गार्डन प्रवेश शुल्क 550रु प्रति व्यक्ती असेल वेळ सकाळी 10:30 ते सायंकाळी 5:30 या मध्ये आपणास खालील सुविधा मिळतील.

चला एकदिवस निसर्गाच्या सानिध्यात

१) सकाळी नाष्टा व चहा किंवा ज्युस
२)दुपारचे जेवण पोट भरुन
३)सायंकाळी चहा/भजे किंवा बिस्कीट
मधल्या वेळेस आपणास मनोरंजना साठी विविध प्रकार चे खेळ कॅरम,चेस क्रिकेट,वॉलीबाल झोका,पाळणा,वाचणयास पुस्तके,रेन डॉन्स, आराम करण्यास बाज,टेंट,आटोळा तेसच बास्केटबॉल,टेनिस बॉल लहाण मुलासाठी बंदुक शॉट रिंगा,बदक,घसरगुंडी,पाळणा,सायकल गाडी बैलगाडी,ट्रॅक्टर फेरी इतर भरपूर,मंदिर दर्शन सेल्फी पॉइंट इत्यादी.



फक्त गार्डन पाहाण्यास 200रु प्रतिव्यक्ती शुल्क आकारल जाईल यामध्ये आपणास नाष्टा व चहा दिला जाईल 3 तासाचा अवधी दिला जाईल

फोटोशुट 1000रु व्हिडियो करणेसाठी 3000रु दर आकारला जाईल

35000/- मध्ये सर्व साहित्यासहीत मंगल कार्यालयाची बुकींग चालु आहे.

१)तसेच फॅमिली सहल(एक दिवसीय) २)शाळेची सहल (एक दिवसीय)
३)बर्थडे पार्टी (एक दिवसीय) ४)गेट टुगेदर (एक दिवसीय)
५)कॉलेज सहल (एक दिवसीय) ६)एगेजमेंट पार्टी (एक दिवसीय)
७)लग्नाची पार्टी (एक दिवसीय) ८)लग्नवाढदिवसाची पार्टी (एक दिवसीय)
९)किट्टी पार्टी (एक दिवसीय)

एक दिवस अगोदर बुकिंग करणे अवश्यक आहे.

संपर्क

श्री.राजराजेश्वरी नगर, राजराजेश्वरी मंदीरच्या समोर, मल्लापूर (देगलूर रोड), उदगीर जि.लातूर